




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०४५ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# भाजप-शिंदेसेनेची युती तुटली

## पुणे महापालिकेत चौरंगी लढत, राजकीय चित्र स्पष्ट

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुणे महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशीही भाजप आणि शिंदेसेना यांची युती झालेली नाही. त्यामुळे शिंदेसेनेने ही निवडणूक स्वबळावर लढविण्याचे ठरवून सर्व जागांवर उमेदवारी अर्ज दाखल केले. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसची आघाडी आणि काँग्रेस, उद्धवसेना व मनसे यांची आघाडी झाली आहे. त्यानुसार उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहे. त्याने पालिका निवडणूक चौरंगी होणार असल्याचे राजकीय चित्र स्पष्ट झाले आहे. भाजपला शह देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) दोन्ही एकत्र आल्यामुळे आणि शिंदेसेना स्वबळावर निवडणूक लढविणार असल्यामुळे निवडणूक चुरशीची होणार आहे.

पुणे महापालिका निवडणूक जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजप आणि शिंदेसेना एकत्र लढणार आहे. राष्ट्रवादी (अजित पवार) बरोबर मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याचे पुण्यात जाहीर केले होते. मात्र सन्मानपूर्वक जागा न दिल्यामुळे शिंदेसेना नाराज होती. भाजप केवळ शिंदे सेनेला १५ ते १७ जागा देत होते. त्यामुळे शिंदे सेनेचे नेते आणि इच्छुक उमेदवार नाराज झाले होते. त्यामुळे शिंदे सेनेच्या स्थानिक नेत्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. त्यानंतर माजी आमदार रवींद्र धंगेकर यांची कोंडी करण्याचा प्रयत्न भाजपने केला होता. भाजपकडून शिंदेसेनेला अपेक्षित प्रतिसाद मिळत नव्हता त्यामुळे शिंदेसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट दोन भाजपवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यानंतर भाजपकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे रात्री उशिरा शिंदे सेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक झाली.

पुण्यात सन्मानजनक जागा मिळत नसतील तर आम्ही स्वबळावर लढू, असा निर्धार आमदार विजय शिवतारे यांनी व्यक्त केला होता. रात्री १२ वाजताच पत्रकार परिषद घेऊन याबद्दलची घोषणा करणार होते. मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मध्यस्थीमुळे ही घोषणा होऊ शकली नाही. त्यानंतर तातडीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने मंत्री उदय सामंत यांना पुण्यात पाठवले. त्यानुसार मंगळवारी सकाळी उदय सामंत यांच्या उपस्थितीत पुण्यातील प्रमुख शिंदेसेना नेत्यांची बैठक झाली. त्या बैठकीत तोडगा निघाला नाही. त्यानंतर भाजप आणि शिंदेसेनेची युती तुटल्यात जमा झाली आहे. सर्व उमेदवारांना आम्ही एबी फॉर्म देणार असल्याचे शिंदेसेनेचे शहर प्रमुख नाना भानगिरे यांनी सांगितले. त्यानंतर शिंदेसेना १६५ जागांवर उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे शिंदेसेनेचे पुणे महानगरप्रमुख रवींद्र धंगेकर यांनी सांगितले. त्यानंतर शिंदेसेनेच्या उमेदवारांना एबी फॉर्म देण्यात आले. भाजपनेही १०० जागांवरील उमेदवारांना आगोदर एबी फॉर्म दिले होते. उर्वरित जागा वरील उमेदवारांनाही एबी फॉर्म दिले. त्यामुळे भाजप आणि शिंदेसेनेची युती तुटली असल्याचे स्पष्ट झाले आहे.





पालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी (अजित पवार) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) या दोन्ही राष्ट्रवादीच्या जागावाटप आणि निवडणूक चिन्हावरून मतभेद झाल्याने चर्चा फिस्कटली होती. त्यानंतर गेल्या दोन दिवसांत राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे पदाधिकारी हे महाविकास आघाडीच्या बैठकीला हजेरी लावत होते. मात्र, महाविकास आघाडीच्या बैठकीला अचानकपणे राष्ट्रवादी (शरद पवार) यांच्या पक्षातील कोणताही पदाधिकारी उपस्थित राहिला नाही. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेपाठोपाठ पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी (अजित पवार) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) दोन्ही एकत्र आले. त्याबाबतची अधिकृत घोषणा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र निवडणूक लढविणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. पालिका निवडणूक काँग्रेस आणि उद्धवसेना एकत्र लढणार आहेत. उद्धवसेनेची आणि मनसेची युती झाली आहे. उद्धवसेनेच्या वाट्याला आलेल्या जागेतून मनसेला काही जागा देण्यात येणार आहे. भाजप आणि शिंदेसेनेची युती न झाल्यामुळे चौरंगी लढत होणार आहे.

### दोन्ही राष्ट्रवादी एकत्र, शिंदेसेना स्बळावर

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) ने महाविकास आघाडीबरोबर काडीमोड घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाबरोबर घरोबा केला आहे. त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे दोन्ही गट एकत्र आले आहेत. भाजपला शह देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) दोन्ही एकत्र आल्यामुळे निवडणूक चुरशीची होणार आहे.

### अर्ज माघारीपर्यंत होऊ शकते युती

पुणे महापालिका निवडणूक जागावाटपात महायुतीमधील भाजपा आणि शिंदेसेना यांच्यात एकमत होऊ शकलेले नाही. दोन्ही पक्षांच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले, पण अर्ज माघारी घेण्याची मुदत २ जानेवारी आहे. मी स्वत: याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली असल्याचे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. त्यामुळे भाजप आणि शिंदेसेनेच्या युतीबाबत अर्ज माघारी घेण्यापर्यंत निर्णय होऊ शकतो असे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

### आरपीआय महायुतीतून बाहेर पडली का?

मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपा-शिंदेसेनेसोबत असलेल्या रामदास आठवले यांच्या आरपीआयला जागा मिळाली नाही. त्यामुळे पक्षाने स्वबळावर ३९ उमेदवार रिंगणामध्ये उतरवले आहेत. रिपाईकडून स्वतंत्रपणे उमेदवार जाहीर करण्यात आल्यानंतर रामदास आठवले मुंबईत महायुतीत बाहेर पडल्याची चर्चा सुरू झाली. त्यावर त्यांनी लगेच खुलासा करत निवडणुकीतील भूमिका मांडली आहे. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी एक पोस्ट करत पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. "आम्ही महायुतीतून बाहेर पडलेलो नाही.

## 'हडपसरच्या तीन प्रभागातून ३४८ उमेदवारी अर्ज दाखल'

**हडपसर: (समर्थ गांवकरी)**

हडपसर येथील १५-१६-१७ या तीनही प्रभागातील बारा जागांसाठी अखेरच्या दिवसापर्यंत तब्बल ३४८ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. सर्वच पक्षांनी ए-बी फॉर्म वाटपात कमालीची गुप्तता पाळत ऐनवेळी उमेदवार आयात करून उमेदवारी दिल्याने त्या त्या पक्षातील मूळ इच्छुक कार्यकर्त्यांनी नाराजीचा सूर आळवला. त्यामुळे पुढील तीन दिवस बंडखोरांना समजविण्यासाठी पक्ष नेतृत्वाला मोठी डोकेदुखी सहन करावी लागणार आहे. येथील तीनही प्रभागासाठी एकूण १ हजार ३४ उमेदवारी अर्जांची विक्री झाली होती. त्यापैकी ३४८ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. त्यातील बहुतांश उमेदवारांनी वेगवेगळ्या जागेसाठी तर अनेकांनी एकाच जागेसाठी दोन वेगवेगळे अर्ज दाखल केले आहेत. ए-बी फॉर्मसह आलेल्या अर्जांनंतर व त्यामध्ये आयात उमेदवारांना संधी दिल्याचे समजल्यावर उमेदवारी नाकारण्यात आलेल्या विविध पक्षांतील इच्छुक उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली आहे. प्रभाग क्रमांक १५ मांजरी बुद्रुक - केशवनगर - साडेसतरानळी मधून अनुसूचित जाती महिला जागेसाठी ३६, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी ३८, सर्वसाधारण महिला जागेसाठी ३२ तर, सर्वसाधारण जागेसाठी २९ असे १३५ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

## २९ महानगरपालिकांचे विरोधक कोण हेच कळेना!

**मुंबई: (समर्थ गांवकरी)**

राज्यातील प्रमुख राजकीय पक्ष हे महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने कुठे एकमेकांसोबत आहेत, तर कुठे विरोधात. त्यांचे नेते दुपारच्या सभेत ज्या पक्षांवर टीका करतील त्याच पक्षांचे कौतुक त्यांना संध्याकाळच्या दुसर्या शहरातील सभेत करावे लागेल, अशी स्थिती निर्माण झाली आहे. भाजप-शिंदेसेना बहुतेक ठिकाणी एकत्र लढणार असे कालपर्यंतचे चित्र असतानाच अनेक ठिकाणी या युतीला मंगळवारी तडे गेले. काँग्रेसची वेगवेगळ्या शहरांमध्ये वेगवेगळ्या पक्षांशी आघाडी झाल्याचे दिसत असून अजित पवार आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये हातमिळवणी केली आहे.

नागपुरात स्वबळावर लढत असलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीने अकोल्यात भाजपशी युती केली आहे. महापालिकागणिक मित्र



आणि विरोधकांची इतकी अभूतपूर्व अदलाबदल यापूर्वी कोणत्याही महापालिका निवडणुकीत झालेली नव्हती. मुंबई, ठाणे, नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे एकमेकांच्या हातात हात घालून मते मागताना दिसतील तर बहुतेक महापालिकांमध्ये एकमेकांवर त्यांना टीका करावी लागणार आहे. मुंबईत उद्धव सेनेच्या विरोधात लढत असलेल्या काँग्रेसने पुण्यात त्यांच्याशी आघाडी केली आहे.

## ७० लाखांचे सोन्याचे दागिने जप्त!

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

पानशेत रस्त्यावर खानापूरमध्ये असलेल्या एका सराफी पेढीवर दरोडा टाकून सव्वा कोटीचे दागिने लुटणाऱ्या चोरट्यांना पुणे ग्रामीण पोलिसांनी अटक केली. चोरट्यांकडून ७० लाख रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. ग्रामीण पोलिसांनी ४८ तासांत ही कामगिरी केली. अंकुश दगडू कचरे (वय २०) आणि गणेश भांबू कचरे (वय २३, रा. कात्रज) अशी अटक करण्यात आलेल्या चोरट्यांची नावे आहेत. आरोपींबरोबर असलेल्या तीन अल्पवयीन साथीदारांना ताब्यात घेण्यात आले आहे, अशी माहिती पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी पत्रकार परिषदेत दिली. शुक्रवारी (ता. २६) पानशेत रस्त्यावरील खानापूर गावात असलेल्या एका सराफी पेढीवर भरदिवसा दरोडा घालण्यात आला होता. चोरट्यांनी कोयता आणि तलवारीच्या धाकाने ऐवज लुटला होता.

## दोन्ही राष्ट्रवादी भाजपासोबत!

- शिंदेसेना, उद्धवसेना, वंचितचे 'एकला चलो रे'

**अकोला : (समर्थ गांवकरी)**

अकोला महापालिका निवडणुकीत महायुतीतील घटकपक्ष शिंदेसेना आणि महाविकास आघाडीतील घटकपक्ष उद्धवसेना या दोन्ही पक्षांसह वंचित बहुजन आघाडीनेही 'एकला चलो रे' ची भूमिका घेतली आहे. भारतीय जनता पक्ष-शिंदेसेना आणि काँग्रेस-उद्धवसेनेत जागावाटपाच्या मुद्द्यावरून एकमत न झाल्याने, या दोन्ही पक्षांनी स्वतंत्र उमेदवार देत रिंगणात उडी घेतली आहे.

काँग्रेसने काही प्रभागांत उद्धवसेनेला पाठिंबा देत, उमेदवारी देण्याचे टाळले आहे. वंचित बहुजन आघाडी व काँग्रेसमध्ये न जमल्याने 'वंचित'नेही ५३ उमेदवार दिले आहेत.

महायुतीतील भाजप, शिंदेसेना



व राष्ट्रवादी (अजित पवार) एकत्र निवडणूक लढतील, अशी चर्चा सुरुवातीपासून होती. परंतु, शिंदेसेनेने २१ जागांच्या मागणीवर ठाम राहत अखेरच्या क्षणापर्यंत मागणी रेटली. त्यामुळे भाजपची शिंदेसेनेसोबत युती होऊ शकली नाही. शेवटी भाजपने ६२ जागी उमेदवार देत १४ जागा राष्ट्रवादी (अजित पवार) आणि ४ जागा इतर घटकपक्षांना सोडल्या आहेत.

जागांचा तिढा न सुटल्याने शिंदेसेनेकडून ७४ जागांवर उमेदवार रिंगणात आणण्यात आले आहेत. महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरद पवार) यांनी अनुक्रमे ५० व २५ जागांवर उमेदवार दिले आहेत. त्यासाठी पक्षाचे निरीक्षक नाना गावंडे यांच्यासह काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी आघाडीच्या चर्चेत सहभाग घेतला.

महाविकास आघाडीतील घटकपक्ष उद्धवसेनेने सुरुवातीपासूनच ५५ जागा लढविण्याची भूमिका जाहीर केली होती. त्यामुळे आघाडीत जागावाटपाचा तिढा निर्माण झाला होता. त्यावर अखेरपर्यंत एकमत होऊ शकले नाही.

आघाडीत दोनच पक्ष लढत आहेत. प्रभाग ४, ६, १३ व २० मध्ये उद्धवसेनेच्या उमेदवारांना काँग्रेस व राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाने पाठिंबा दिला आहे. काही जागांवर काँग्रेस व राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षातही मैत्रीपूर्ण लढती होण्याची चिन्हे आहेत.

# अनेकांना कात्रजचा घाट

## पुण्यात भाजपकडून ३० ते ४० माजी नगरसेवकांचा पत्ता कट

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

महापालिका निवडणुकीसाठी मागील अनेक वर्ष तयारी करत असलेल्या आणि प्रभागामध्ये चांगली ताकद असलेल्या अनेकांना भाजपने कात्रजचा घाट दाखवल्याचे मंगळवारी समोर आले. यातील बहुसंख्य इच्छुकांना नगरसेवक पदाच्या कार्यकाळात छाप पडेल असे काम केले नाही, तसेच लोकसभा व विधानसभा निवडणुकीत पक्षाचे काम केले नाही, म्हणून डावलण्यात आल्याची चर्चा सुरू आहे.

महापालिकेच्या विसर्जित सभागृहातील माजी नगरसेवक न्यायालयाच्या कचाट्यात अडकलेली महापालिकेची निवडणूक केव्हा होते, याकडे डोळे लावून बसले होते. मतदारांशी संपर्क तुटू नये, यासाठी माजी नगरसेवक खबरदारी घेत होते. खिशातील पैसा खर्च करून विविध कार्यक्रम घेऊन चर्चेत राहण्याचा प्रयत्न करत होते. अखेर साडेतीन वर्षांनंतर महापालिकेची निवडणूक जाहीर झाल्याने माजी नगरसेवकांनी जय्यत तयारी केली होती. यामध्ये केंद्रात आणि राज्यात सत्तेवर असलेल्या भाजपमधील माजी नगरसेवक आघाडीवर होते.



भाजपकडून निवडणूक लढल्यानंतर हमखास यश मिळेल, या विश्वासाने इतर पक्षातील इच्छुकांचा ओढाही भाजपकडे होता. त्यामुळे अनेकांनी भाजपमध्ये प्रवेशही केला. आयारामांसह पक्षातील माजी नगरसेवकांनी मुलाखती दिल्या. मात्र, भाजपने पक्षाच्या ३० ते ४० माजी नगरसेवकांचा पत्ता कट केल्याचे समोर आले आहे. भाजपने उमेदवार यादी जाहीर केली नाही, त्यामुळे नेमका किती माजी नगरसेवकांचा पत्ता कट झाला आहे, ती संख्या कळत नाही.

सूत्राकडून मिळाल्या माहितीनुसार, भाजपने अमोल बालवडकर, दीपक पोटे, माधुरी सहस्त्रबुद्धे, राजश्री नवले, नीता दांगट, आरती कोंढरे, मनीषा कदम, जयंत भावे, स्वाती लोखंडे, शंकर पवार, प्रकाश ढोरे, गायत्री खडके, राजश्री काळे, राजेश ऐनपुरे, सुनीता गलांडे, संदीप जऱ्हाड, वृषाली चौधरी, अर्चना मुसळे यांच्यासह इतरांचा पत्ता कट केला. पक्षाने आपला पत्ता कट केल्याची कुणकुण लागताच अनेकांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षात प्रवेश करत त्यांची उमेदवारी गळ्यात पाडून घेतली. तर काहींनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला.

भाजपने पत्ता कट केलेल्या बहुसंख्य माजी नगरसेवकांना नगरसेवक पदाच्या कार्यकाळात छाप पडेल असे काम केले नाही, किंवा लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत दिलेली जबाबदारी पार पाडली नाही, आमदारांना आव्हान दिले, आदी कारणांची चर्चा आहे.




# जिल्हा परिषद शाळेची विकासाकडे भक्कम वाटचाल



**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट तालुक्यातील मोहपुर येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा ही ग्रामपंचायतच्या सक्रिय सहकार्यामुळे शैक्षणिक व भौतिक सुविधांच्या बाबतीत सातत्याने प्रगती करत असून, ग्रामीण भागातील आदर्श शाळा म्हणून नावारूपास येत आहे.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, आधुनिक शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी आणि डिजिटल युगाशी पाऊल मिळवून चालता यावे, या उदात्त हेतूने ग्रामपंचायत मोहपुरकडून शाळेसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सरपंच सौ. सुवर्णा देविदास आमले, उपसरपंच दीपक सातव व शिक्षणप्रेमी पोलीस पाटील प्रदीप सोनटक्के यांच्या संकल्पनेतून शाळेत संगणक संच, दूरचित्रवाणी, सीसीटीव्ही कॅमेरे, प्रिंटर आदी आधुनिक शैक्षणिक व सुरक्षेसाठी आवश्यक बाबी प्रदान करण्यात आल्या आहेत.

शाळेतील वाढती विद्यार्थी संख्या आणि अपुऱ्या वर्गखोल्या ही अडचण लक्षात घेत प्रदीप सोनटक्के यांनी आपल्या मालकीची जागा शाळेच्या विस्तारासाठी दान देऊन एक आदर्श उदाहरण घालून दिले आहे. यामुळे भविष्यात नवीन वर्गखोल्या उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून ग्रामपंचायतच्या वतीने कूपनलिकेद्वारे स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली असून, मुला-मुलींसाठी स्वतंत्र शौचालयांचे बांधकामही करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ व सुसज्ज शालेय वातावरण मिळत आहे.

विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती निर्माण व्हावी व भविष्यातील स्पर्धा परीक्षांसाठी त्यांची मानसिक तयारी व्हावी, या उद्देशाने शाळेत साप्ताहिक सामान्य ज्ञान स्पर्धांचे आयोजन केले जाते. यासह विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व सहशालेय उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासावर भर दिला जात आहे.

या सर्व उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायत अधिकारी सुनील उत्तम जाधव, शाळेतील शिक्षक ग. नु. जाधव, सचिन नरवाडे, रवींद्र चौधरी, अमोल सुकलवाड, गजानन राठोड, संघरत्न घुले, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आनंदा तांबारे, तसेच गावातील नागरिक मारुती हापसे, कपिल सातव, डॉ. प्रभावती गवळे, भगवान चिरंगे आदी सर्वजण प्रयत्नशील आहेत.

ग्रामपंचायत, शिक्षकवृंद व ग्रामस्थांच्या एकत्रित सहकार्यामुळे मोहपुर येथील जिल्हा परिषद शाळा ही केवळ शिक्षणाचे केंद्र न राहता, ग्रामीण विकासाचा एक प्रेरणादायी आदर्श ठरत आहे.

# विष्णुपुरी येथील काळेश्वर मंदिरासाठी पर्यायी रस्त्याच्या वापर करावा

## ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने आवाहन



**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

पंचक्रोशीतील प्रसिध्द असलेल्या नांदेड तालुक्यातील विष्णुपुरी येथील काळेश्वर मंदिरासाठी सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्याचे काम हाती घेण्यात आले असून अंतिम टप्यात होत असलेल्या कामासाठी 30 डिसेंबर ते 25 जानेवारी रोजी पर्यंत रस्ता बंद केला असुन भाविक भक्तांनी व ग्रामस्थांनी पर्यायी रस्त्याच्या वापर करावा व असरजन येथील नव्याने होत असलेल्या पुलावरून पायी चालत येऊन काळेश्वर मंदिर कडे यावे व वाहने संबंधित पार्किंग ठिकाणी लावावेत असे आवाहन ग्रामपंचायत विष्णुपुरीचे सरपंच सौ.संध्याताई विलास हंबर्डे यांनी केले आहे.

विष्णुपुरी ग्रामपंचायत कार्यालय अंतर्गत गावातील मुख्य रस्त्या हा दुतर्फा रस्ता सिमेंट कॉंक्रीट झाले असुन शेवटच्या टप्प्यात गावातील प्रमुख रस्त्याने सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्याचे काम 30 डिसेंबर ते 25 जानेवारी रोजी पर्यंत होणार आहे, यासाठी पर्यायी रस्ता करण्यात आला असून भाविक भक्तांनी व वाहनधारकांनी नोंद घ्यावी,

व नांदेड शहरातुन ,परिसरात येणाऱ्या भाविक भक्तांनी असरजन येथील रस्ता क्रमांक 22 हा पुलाचा लगत असलेल्या पार्कींग ठिकाणी वाहने लावुन पुलावरून पायी चालत जाऊन मंदीर कडे येऊन दर्शन घ्यावे असे आवाहन ग्रामपंचायत कार्यालय विष्णुपुरी सरपंच प्रतिनिधी सौ.संध्या हंबर्डे यांनी केले आहे.

# सुभम शेवाळे यांची युवा उपाध्यक्ष पदी निवड



**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील बरबडा येथील रहिवासी असलेल्या सुभम रूपेश शेवाळे यांची शिवसेना युवा जिल्हा उपाध्यक्ष निवड आमदार बालाजी कल्याणकर व शिवसेना जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे यांच्या हस्ते नियुक्त पत्र देण्यात आले आहे.

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे व स्व. आनंदजी दिघे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना नेते एकनाथभाई शिंदे माजी (मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार शिवसेना व आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या सुचनेनुसार जिल्हाप्रमुख गंगाधर दिगंबर पाटील बडूरे यांनी पक्षाशी एकनिष्टेने करण्यातसाठी व त्यांची कामकरी गंगाधर पाटील बडूरे यांनी सुभम शेवाळे यांची शिवसेना नांदेड पक्षाच्या जिल्हा युवा उपाध्यक्ष पदी निवड करण्यात पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे बरबडा येथे व बसटॅपवर मित्रांनी व परिसरातील व कार्यकर्त्यांकडून मोठ्या उत्साहाने अभिनंदन करण्यात येत आहे बरबडा येथे नगरीत आगमन झाले असता बस्टप फटाके फोडू स्थानकावर ढोलताशांच्या गजरात फटाक्यांच्या आवाजाने स्वागत करण्यात आले यावेळी उपस्थित मित्रपरिवार व कार्यकर्ते अभिनंदन करण्यात आले आहे. यावेळी शिवप्रसाद बडुरे , प्रतिक जाधव, राजू पाटील शिंदे , विजयी शेवाळे , कांबळे व आदि मित्र परिवार उपस्थित होते.

# डॉ. भगवान निळे यांची नियुक्ती

**तामसा : (समर्थ गांवकरी)**



किल्ले वाफगाव ता. खेड जि. पुणे येथे होणाऱ्या महाराजा यशवंतराव होळकर (प्रथम )राज्याभिषेक महोत्सव समिती मध्ये हदगांव तालुक्याचे भूमिपुत्र डॉ. भगवान निळे यांची नांदेड जिल्हा प्रतिनिधी मनहून निवड करण्यात आली. महाराजा यशवंतराव होळकर(प्रथम ) राज्याभिषेक महोत्सव समिती किल्ले वाफगाव इथे होणाऱ्या राज्य अभिषेक सोहळा साठी नांदेड जिल्ह्याच्या प्रतिनिधित्व करण्यासाठी समिती प्रमुख होळकर घराण्याचे वंशज भूषणसिंह राजे होळकर यांनी डॉक्टर बी के निळे यांची नियुक्ती करण्यात आली.

# अवैध जुगार अड्यावर छापा कारवाई करुन मुद्देमाल केला जप्त

## नांदेड ग्रामीण गुन्हे शोध पथकाची कामगीरी



**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या पंकज नगर धनेगाव येथे तिरट नावांचा जुगार खेळत असतांना सहा आरोपींना अटक करून मोबाईल फोन,मोटार सायकल यासह जुगाराचे असे एकुण 2 लाख 65 हजारांच्या मुद्देमाल जप्त करून पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड व त्याचा पथकाने ही कार्यवाही केली असून या कार्यवाहीचे जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व वरीष्ठ अधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.

अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यावर कारवाई करणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले होते.त्या अनुषंगाने ओमकांत चिंचोलकर पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड व पथकातील अंमलदार हे दिनांक 27 रोजी वेळ 17.25 वा. सुमारास पेट्रोलींग करीत असताना त्यांना गोपनीय माहीती मिळाल्यावरुन नमुद पथकाने पंकज नगर धनेगाव येथे बाळु भंगारे यांचे घराशेजारी तिर्रट नावाच्या चालु असलेल्या जुगार अड्यावर छापा कारवाई केली असता वर नमुद आरोपी हे जुगार खेळताना मिळुन आल्याने त्यांचेकडुन नगदी रुपये मोबाईल फोन, मोटारासायकल व जुगाराचे साहीत्य असा एकुण 2,65,500/- रुपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करुन नमुद आरोपींतावर वर प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिस कर्मचारी सतार शेख मगदूम यांच्या फिर्यादीवरून सहा आरोपी विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगिरीचे . अविनाश कुमार, पोलीस अधिकारी यांनी ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्ये अभिनंदन केले आहे.

# माळेगाव कला महोत्सवात शाहीर बळीराम जाधव सुजलेगावकरानी जिंकली रसिकाची मने



**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

देशात अव्वल क्रमांकाची असलेली सुप्रसिद्ध माळेगाव यात्रेत दरवर्षीप्रमाणे याही वर्षी लोककला महोत्सव साजरा केला जातो. नायगाव तालुक्यातील प्रसिद्ध शाहीर बळीराम जाधव सुजलेगावकर यांनी श्री खंडेरायाचे वंदन गीत बहारदारपणे सादर करून रसिक जनाची मने जिंकली .

माळेगाव येथील प्रसिद्ध यात्रेत दरवर्षीच कला महोत्सव साजरा होत असून या कला महोत्सवात महाराष्ट्रातील नामवंत कलावंताची हजेरी असते या कल महोत्सवाचे उद्‌घाटन जिल्हा परिषदचे माजी सभापती प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले तर यावेळी आमदार आनंदराव बोंढारकर व लोहा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.प्रारंभी महाराष्ट्र गीतानंतर नायगाव तालुक्यातील मौजे सुजले गाव येथील प्रसिद्ध शाहीर बळीराम जाधव यांच्या नटराज सांस्कृतिक कलापथकातील कलाकारांनी प्रथम नमन श्री गणेशाला.. दुसरे वंदन श्री खंडेरायाला ..असे वंदन गीत शाहीर बळीराम जाधव सुजलेगावकर व संचानी बहारदारपणे सादर केले असून रशिक वर्गानी या वंदन गीताला चांगलीच दाद दिली आहे. सदर यात्रेत कुठलाच अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता याकरिता पोलीस प्रशासनाचे देखील जाहीर रित्या आभार शाहीर बळीराम जाधव यांनी मानले तर नटराज सांस्कृतिक कलापथक सुजलेगाव या पथकातील मास्टर माधव पवार,ढोलकी वादक गंगाधर वाघमारे, शेषराव वडजे,शाहीर नागोराव डोणगावकर, मधुकर शिंदे या कलाकारांचा समावेश होता.



# मेजर विठ्ठल थोटे यांना पितृशोक

**कंधार: (समर्थ गांवकरी)**

कंधार,सिद्धार्थ नगर येथील पांडुरंग लालबा थोटे यांचे वयाच्या 73 व्या वर्षी शनिवारी रोजी रात्री अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते मेजर विठ्ठल थोटे यांचे वडील होत. त्यांच्या पार्थिवावर रवीवारी दि.28 रोजी दुपारी 2 वाजता स्मशानभूमी कंधार येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,एक मुलगी,सुना,नातू असा मोठा परिवार आहे. कंधार,सिद्धार्थ नगर येथील मेजर विठ्ठल थोटे याचे वडील तर शिक्षक आकाश थोटे यांचे ते काका होतं.

# राजेंद्र शिंदे राष्ट्रीय ज्ञानयज्ञ कलाभूषण पुरस्काराने सन्मानित

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



जुन्नर तालुक्याचे भूषण उदापूर गावचे सुपुत्र कु राजेंद्र लक्ष्मण शिंदे यांना कवी सरकार वाचन मंदिर आयोजीत २६ वे मराठी साहित्य संमेलन कोल्हापूर येथे " राष्ट्रीय ज्ञानयज्ञ कला भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.सुप्रसिद्ध निवेदक, होम मिनिस्टर फेम आणि फिल्म कलाकार,वारकरी संप्रदायात विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्टकामगिरी म्हणून त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

उदापुर ग्रामस्थ व जुन्नर तालुक्याच्या सर्व मित्र परिवाराच्या वतीने त्यांचे खूप खूप अभिनंदन वर्षाव होत आहे यावेळी त्यांचे सोबत शिवसेना शिंदे गटाचे जुन्नर तालुका अध्यक्ष

विकास राऊत,स्वप्निल आहिनवे आणि रोहिदास अमुप उपस्थित होते. कवी सरकार स्वाभिमानी वाचनालय इंगळी आयोजित २६ मराठी ग्रामीण साहित्य संमेलन कोल्हापूर करवीर वाचन मंदिर येथे आयोजित केलेले आहे २८ डिसेंबर रोजी कोल्हापुरात वितरण करण्यात आले आहे.

सदर साहित्य संमेलनात विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते यात उत्कृष्ट निवेदक व होम मिनिस्टर फेम (खेळ पैठणीचा) आणि वारकरी संप्रदाय /फिल्म कलाकार कु राजेंद्र लक्ष्मण शिंदे उदापूर ता: जुन्नर यांना राष्ट्रीय ज्ञानयज्ञ कलाभूषण पुरस्कार जाहीर झाला असून या सर्वांचे साहित्य क्षेत्रात अभिनंदन व कौतुक होत आहे असे कवी सरकार इंगळी यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे कळविले आहे.

# राज्य अजिंक्यपद वेटलिफ्टिंग स्पर्धेत योगिताला सुवर्ण, पूनमला कांस्य पदक





**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

नुकत्याच तळेगाव दाभाडे, पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य युथ, ज्युनियर व सिनियर वेटलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत बाबुजी आव्हाड महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. योगिता खेडकर हिने सिनियर गटात अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना ८६ किलो वरील वजन गटात ८८ किलो स्नॅच व १०८ किलो क्लीन अँड जर्क असे एकूण १९६ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले तर युथ वयोगटात कु. पूनम काकडे हिने ६९ किलो वजन गटात ७५ किलो स्नॅच व ९५ किलो क्लीन अँड जर्क असे एकूण १७० किलो वजन उचलून कांस्य पदक पटकावले. या यशाबद्दल पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष अॅड. सुरेशराव आव्हाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट वेटलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. सुभाष देशमुख, उपाध्यक्ष राजेंद्र सोनवणे, प्रा. संजय धोपावकर, यांनी अभिनंदन केले. त्यांना अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट वेटलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव व महाविद्यालयाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विजय देशमुख व क्रीडा शिक्षक प्रा. सचिन शिरसाट यांचे मार्गदर्शन मिळाले.

# मनोज जरांगे पाटील छावा भारत क्रांती मिशनच्या बैठकीस राहणार उपस्थित

**नाशिक: (समर्थ गांवकरी)**



नववर्षाच्या सुरुवातीला १ जानेवारीला नाशिक जिल्हा व सिन्नर तालुक्यातील पांगरी येथील हरि बाबा मंदिर प्रांगण येथे दुपारी ११ वाजता मुबई येथील मराठा आरक्षणाच्या विजयी लढ्यानंतर संघर्ष योद्धा मनोज जरांगे दादा पाटिल हे उपस्थित राहणार आहे.

छावा भारत क्रांती मिशनचा वर्धापन दिन व राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विलासभाऊ पांगारकर यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यास उपस्थित राहून जनसमुदायाला राष्ट्रहित आणि समाजहितावर अनमोल मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या स्वागतासाठी नाशिकमध्ये अभूतपूर्व तयारी करण्यात आली असल्याची माहिती पत्रकार परिषदेत

मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विलासभाऊ पांगारकर, मुख्य समन्वयक विजय काकडे पाटील, सीओ ऑर्गनायझेशन संघटनेचे उत्तमराव मांढरे, जळगांव येथील राजेंद्र सोनवणे, नितीन पाटील यांनी दिली. छावा भारत क्रांती मिशनचे, संकल्प आणि शिवजागरणाचे महाअधिवेशन' आयोजित करण्यात आले आहे. हे अधिवेशन केवळ एक औपचारिक सोहळा नसून, २१ व्या शतकातील भारताच्या भावी वाटचालीची दिशा ठरणारे एक ऐतिहासिक आणि जागतिक व्यासपीठ ठरणार आहे..

अध्यात्म आणि सामाजिक एकतेचा महाकुंभ: या महाअधिवेशनास शिंदखेड राजाचे श्री शिवाजीराजे जाधव, मा.मंत्री ना. माणिकराव कोकाटे साहेब , सिंहस्थ कुंभमेळ्याचे राष्ट्रीय प्रवक्ता महंत डॉ. भक्ती चरणदास महाराज, जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराजांचे उत्तराधिकारी श्री श्री जगद्गुरु शांतीगिरीजी महाराज, जगद्गुरु द्वाराचार्य डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर, महामंडलेश्वर शनिभक्त संत सुकदेव महाराज यांच्यासह विविध राजकीय सामाजिक शैक्षणिक अध्यात्मिक व्यावसायिक मान्यवर उपस्थिती राहणार आहे.

आगामी १९ फेब्रुवारी २०२६ रोजी जगन्नाथ पुरी (ओडिसा) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय शिवजयंतीच्या नियोजनासाठी राजस्थान, हरियाणा, जम्मू-काश्मीर, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड,ओडिसा, उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि तामिळनाडू या नऊपेक्षा जास्त राज्यांतील पदाधिकारी या अधिवेशनात सहभागी होणार आहेत.

**ऐतिहासिक राष्ट्रीय संकल्प : नव्या भारताचा रोडमॅप**

या महाअधिवेशनात 'भारत क्रांती मिशन' सात मुख्य संकल्पांचा जागर करणार आहे.

१. राष्ट्र गौरव यात्रा : ९ हजार किमीची अभूतपूर्व राष्ट्र गौरव यात्रा.
२. सत्य इतिहासाचा जागर: भारताचा खरा आणि गौरवशाली इतिहास जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे.
३. अखंड भारत संकल्प: सांस्कृतिक आणि वैचारिक स्तरावर अखंड भारताची संकल्पना दृढ करणे.
४. रोजगार महासंकल्प: २५ लाख 'किसान ड्रोन' च्या माध्यमातून रोजगाराची निर्मिती.
५. कृषी क्रांती: १ लाख भारत किसान ड्रोन डिलरशिपचे वितरण. ६. आत्मनिर्भर भारत: शिक्षण आणि उद्योगाच्या माध्यमातून युवकांना स्वावलंबी बनवणे. ७. आंतरराष्ट्रीय शिवजन्मोत्सव: जगन्नाथपुरी २०२६ च्या भव्य नियोजनाची घोषणा.

छत्रपती शिवरायांचे विचार जागतिक पातळीवर नेण्यासाठी १ जानेवारीपासून 'जय शिवराय' ऐतिहासिक स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात येणार आहे. याद्वारे १४० कोटी भारतीयांना जोडून एक नवा जागतिक विक्रम प्रस्थापित करण्याचा संकल्प मिशनने केला आहे.

याप्रसंगी सामाजिक,उद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या समाज बांधवाचा छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्र गौरव पुरस्कार' देऊन गौरविण्यात येणार आहे. या ऐतिहासिक क्रांती पर्वात सहभागी होण्यासाठी डॉ. विलासभाऊ पांगारकर, किशोरभाऊ चव्हाण, विजय काकडे पाटील, परमेश्वर नलावडे पाटील यांच्यासह समस्त पांगरी ग्रामस्थ आणि संघटनेच्या वतीने सर्वच क्षेत्रातील तमाम राष्ट्रप्रेमी नागरिकांना लाखोंच्या संख्येंने उपस्थीत राहण्याचे आवाहन केले.

# नदी परिसरात अस्वच्छतेने भाविकांत नाराजी

## प्रशासनाच्या दुर्लक्षाने स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**

'स्वच्छ आळंदी, सुंदर आळंदी आणि हरित आळंदी'चा नारा दिला जात असतानाच, प्रत्यक्षात मात्र तीर्थक्षेत्राचे पावित्र्य धोक्यात आले आहे. इंद्रायणी नदी पात्र आणि मंदिर परिसरात पसरलेली अस्वच्छता, धुळीचे साम्राज्य आणि सांडपाण्यामुळे भाविकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. या पार्श्वभूमीवर, दोषी ठेकेदारावर तात्काळ कारवाई करून त्याला 'ब्लॅक लिस्ट' करण्याची मागणी नमामि इंद्रायणी प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर यांनी केली आहे.

इंद्रायणी नदीत थेट सांडपाणी; भाविकांच्या श्रद्धेला तडा

मिळालेल्या माहितीनुसार, आळंदीतील श्री भक्त पुंडलिक मंदिरासमोरून ड्रेनेजचे सांडपाणी थेट इंद्रायणी नदीपात्रात मिसळत आहे. महात्मा गांधी रक्षा विसर्जन स्थळ आणि पुंडलिक मंदिर यांसारख्या वर्दळीच्या आणि पवित्र ठिकाणी सांडपाण्याचे लोंढे वाहत असल्याने भाविकांच्या श्रद्धेला तडा जात आहे. नदीपात्रात सांडपाणी जात असल्याने जलप्रदूषण वाढले असून प्रशासनाने याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे.

धुळीचे साम्राज्य आणि कचरा ज्वलन; आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

आळंदी शहरात सध्या धुळीचे साम्राज्य पसरले आहे, ज्याचा मोठा फटका स्थानिक नागरिक आणि दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना बसत आहे. तसेच, इंद्रायणी नदी घाटावर उघड्यावर



कचरा जाळला जात असल्याचे समोर आले आहे. यामुळे वायू प्रदूषणात भर पडत असून श्वसनाचे विकार जडण्याची शक्यता व्यक्त होत आहे. ठेकेदारावर कारवाई करणे गरजेचे आहे. कामात निष्काळजी पणा करणाऱ्या संबंधित ठेकेदारास तात्काळ नोटीस बजावून त्याला काळ्या यादीत टाकावे. सांड पाण्यावर उपाययोजना: ड्रेनेजचे पाणी नदीत जाण्यापासून रोखण्यासाठी मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी तातडीने पावले उचलावीत.

नागरिकांच्या आणि भाविकांच्या आरोग्यासाठी नगरपरिषदेने स्वच्छता मोहीम सुरू करण्याची आवश्यकता आहे. तीर्थक्षेत्र आळंदीचे पावित्र्य जोपासणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. मात्र, सध्याची परिस्थिती पाहता प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

पुढील काळात तात्काळ सुधारणा झाली नाही, तर नागरिक आणि भाविकांचा रोषास प्रशासन जबाबदार राहील.

या संदर्भात आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांना कळविण्यात आले आहे.

# APL क्रिकेटचे ब्लॅक ब्लॅक पत्थर टीमने पटकावले

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

एपीएल क्रिकेटचे फायनल ब्लॅक पँथर क्रिकेट टीमने पटकावले तर दुसरे छत्रपती वारियर्स क्रिकेट टीमने व तिसरे सरपंच वॉरियर्स क्रिकेट टीमने पटकावले आहे. दि.२८ रविवारी रोजी अंतिम सामना पाहण्यासाठी प्रेक्षकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.



अर्धापुरात प्रथमच APL क्रिकेट मॅचचे आयोजन कै.मारोतराव कानोडे स्टेडियमवर करण्यात आले होते. यामध्ये प्रथम नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख यांच्याकडून २१ हजार रुपये तर दुसरे शशिकांत क्षीरसागर ११००० ह.रू.तिसरे युवा नेते सदाशिव पाटील कपाटे ७००० हे.रू. असे बक्षीस ठेवण्यात आले होते.

अंतिम फेरीचा सामना ब्लॅक पत्थर क्रिकेट क्लब व छत्रपती वॉरियस या संघामध्ये झाला होता. या कार्यक्रमास नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, युवा नेते सदाशिव कपाटे, व्यंकटी राऊत, सरपंच प्रतिनिधी राजेश लोणी, नामदेव सरोदे, अझर काजी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण करण्यात आले.

ब्लॅक पत्थर क्रिकेट संघाला दिलेले टारगेट पूर्ण करून प्रथम बक्षीस ब्लॅक पत्थर क्रिकेट टीमचे कप्तान अभिषेक गुरखेल यांना ट्रॉफी २१००० ह.रु.बक्षीस देण्यात आले. द्वितीय पारितोषिक छत्रपती वारीस संघाला ट्रॉफी ११००० ह.रू. तर तृतीय पारितोषिक सरपंच इलेव्हन संघाला ट्रॉफी ७००० ह.रु. बक्षीस देण्यात आले.

APL स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पुरभाजी कानोडे,अविनाश जिंके,नंदकिशोर कल्याणकर,सुमित कानोडे तर सामन्याचे समालोचन जगदीश राऊत यांनी केले. क्रिकेट सामने पाहण्यासाठी तालुक्यातील क्रिकेट प्रेमी ने मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

# शांकभरी नवरात्र महोत्सवास आरंभ

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थान येथे शांकभरी नवरात्र महोत्सवास पारंपारिक उत्साहात व वेदमंत्राच्या जयघोषात आरंभ करण्यात आला. श्री मोहटादेवी देवस्थान विश्वस्त मंडळाच्या वतीने विश्वस्त अ‍ॅड. विक्रम वाडेकर, सौ. पुजा वाडेकर यांच्या हस्ते विधीवत महापुजा करण्यात आली. राज्याच्या विविध भागांतून हजारो भावीक भक्तांनी भेट देवून देवीचे दर्शन घेतले.

देवस्थानमार्फत वासंतिक, शारदीय व शांकभरी अशी तीन नवरात्रे साजरी होतात. शांकभरी नवरात्रोत्सवामध्ये रोज पारंपारिक उत्सव, त्रिकाल आरत्या, सुवासिनी पूजन, श्री सप्तशती पाठ वाचन, दररोज अर्जन, अन्नदान करण्यात येणार आहे. सकल भारतवासीय देवीभक्तांचे उत्तम आरोग्य व धनधान्य, सुख समृध्दी प्राप्त व्हावी आणि माणंसामध्ये ऐक्य, प्रेम भाव



निर्माण व्हावा, असा संकल्प करून देवीस प्रार्थना करण्यात आली.

देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे, लेखापाल संदिप घुले, कर्मचारी, ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे पौरोहित्य भूषण साकरे, भास्कर देशपांडे यांनी केले. शांकभरी नवरात्र महोत्सवाची सांगता होमहवन, पूर्णाहुती शनिवार दि. ०३ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे.



# माजी सरपंच कोंडीबा गायकवाड यांचे निधन

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

हदगाव तालुक्यातील लोहा येथील माजी सरपंच कोंडीबा धोंडीबा गायकवाड (७५) यांचे २७ डिसेंबर रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर २८ रोजी दुपारी २ वाजता लोहा येथे अंत्यसंस्कार करण्यात आला आहे. त्यांच्या पश्चात मुलगा वैजनाथ,२ मुली, नातवंड असा परिवार आहे.

# शिवरायांचे गड आजही उपेक्षित; ही अवस्था मन सुन्न करणारी

## खासदार निलेश लंके

**साल्हेर : (समर्थ गांवकरी)**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची साक्ष देणारे गड–किल्ले आजही दुर्लक्षित अवस्थेत आहेत. ऐतिहासिक वारशाची होत असलेली ही दुरवस्था मन सुन्न करणारी असून, गड संवर्धनासाठी सातत्याने पाठपुरावा करत राहणार असल्याचा ठाम निर्धार खासदार निलेश लंके यांनी व्यक्त केला.



खासदार लंके यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या 'आपला मावळा' या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून गड संवर्धन, जतन, स्वच्छता व वृक्षारोपण मोहिमेचा दहावा टप्पा आज ऐतिहासिक साल्हेर गडावर यशस्वीरीत्या पार पडला. या मोहिमेत खासदार भास्कर भगरे यांच्यासह शेकडो मावळ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. गडावरील प्लास्टिक कचरा, बाटल्या, थर्माकोल यांसारखा अपायकारक कचरा संकलित करून परिसर स्वच्छ करण्यात आला. तसेच गडावरील ऐतिहासिक वास्तूंचे संवर्धन, पायवाटांची साफसफाई व ठिकठिकाणी सौरदिवे व पर्यटकांना बसण्यासाठी बेंच तसेच नामफलक लावण्यात आले. यावेळी बोलताना खासदार निलेश लंके म्हणाले, "शिवरायांचे गड म्हणजे केवळ दगड-माती नव्हे, तर तो आपला स्वाभिमान, इतिहास आणि अस्मिता आहे. या गडांची आजची अवस्था पाहून मन हेलावून जाते. सरकार, प्रशासन आणि नागरिकांनी एकत्र येऊन गड संवर्धनासाठी पुढाकार घेतला पाहिजे. 'आपला मावळा' च्या माध्यमातून हा लढा थांबणार नाही."

खासदार भास्कर भगरे यांनीही मोहिमेचे कौतुक करत गड-किल्ले जपण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची असल्याचे सांगितले.

ही मोहीम केवळ स्वच्छतेपुरती मर्यादित नसून, युवा पिढीमध्ये इतिहासाबाबत जाणीव निर्माण करणे आणि शिवरायांचा वारसा जपण्याचा संदेश देणारी असल्याचे उपस्थित मावळ्यांनी सांगितले.

# संदीप नाईक यांना 'कृषीरत्न' पुरस्काराने गौरव

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

शेतकऱ्यांचे कैवारी आणि भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांची १२७ वी जयंती जळगावमध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. भारतीय कृक्षक समाज नवी दिल्ली (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने या भव्य शेतकरी मेळाव्याचे आणि पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्यात समाजासाठी आणि कृषी क्षेत्रासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नारायणगाव येथील उद्योजक संदीप नाईक यांचा 'डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी औचित्य साधून पुणे जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी उद्योजक संदीप नाईक यांना सोपवण्यात आली . यावेळी कृक्षक समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. कृष्णवीर चौधरी, महाराष्ट्र




राज्य अध्यक्ष डॉ. सुभाष नालांगे, राज्य प्रभारी ज्योती सुरसे, प्रदेशाध्यक्ष स्वाती बोरीकर व उपाध्यक्ष रूपाली गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले.

या सोहळ्यात जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी खेड तालुका अध्यक्ष गोविंद निवृत्ती जाधव ,जुन्नर तालुका अध्यक्ष जयप्रकाश शिंदे , जुन्नर तालुका सरचिटणीस रमेश इनामके ,जुन्नर तालुका अध्यक्ष पूनम कानडे , खेड तालुका अध्यक्ष वैशाली बनकर , आंबेगाव तालुका अध्यक्ष संजय चंद्रकांत अभंग , जुन्नर तालुका उपाध्यक्ष धनंजय खंडू बिडवई कार्यकारणी मान्यवरांच्या उपस्थितीत जाहीर केली .

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र ,जम्मू-काश्मीर, उत्तर प्रदेश, हरियाणा, तामिळनाडू, पंजाब, राजस्थान, गुजरात उत्तराखंड या राज्यांचे अध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षक-प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**------ : (समर्थ गांवकरी)**

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट बेल्हे येथे नुकतेच ३ दिवसीय शिक्षक-प्रशिक्षण (फॅकल्टी डेव्हलपमेंट) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.राजेंद्रसिंह परदेशी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करून मान्यवरांच्या उपस्थितीत या तीन दिवसीय कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

सकाळच्या सत्रात डॉ.राजेंद्रसिंह परदेशी यांनी "इफेक्टिव्ह टिचिंग मेथडॉलॉजी अँड मोटिवेशनल स्पीच" या विषयावर मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रामध्ये अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे यांनी शिक्षण क्षेत्रातील व्यावसायिक नितीमूल्ये या बाबतचे महत्व विशद केले.

# महायुतीकडून दिलेला शब्द पाळला जातो का?

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व शिंदे गटाच्या शिवसेनेसोबत महायुती करून निवडणूक लढवली. या महायुतीअंतर्गत झालेल्या जागावाटपाच्या वाटाघाटीत प्रभाग क्रमांक 8 मधून माजी उपनगराध्यक्ष अजय चाडावार यांना भाजपाकडून अधिकृत ए.बी. फॉर्म जोडून उमेदवारी देण्यात आली होती. मात्र अंतिम टप्प्यात सदर प्रभागाची जागा ही युतीच्या निर्णयानुसार शिवसेना (शिंदे गट) यांना सोडण्यात आल्याने, पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार अजय चाडावार यांनी आपली उमेदवारी मागे घेतली. विशेष बाब म्हणजे उमेदवारी मागे घेत असताना त्यांच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांना स्वीकृत सदस्य पदाबाबत स्पष्ट ग्वाही दिली होती. ही ग्वाही



महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना (शिंदे गट) या तिन्ही घटक पक्षांकडून देण्यात आल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. अजय चाडावार यांनी युतीधर्म पाळत आणि वरिष्ठांचा आदेश मान्य करत घेतलेला हा निर्णय महायुतीतील शिस्त आणि समन्वय दर्शविणारा मानला जात आहे. मात्र आता निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांना महायुतीकडून प्रत्यक्षात स्वीकृत सदस्य म्हणून सभागृहात स्थान दिले जाणार की नाही, याकडे शहरातील जाणकार राजकीय व्यक्तींचे लक्ष लागले आहे. अजय चाडावार हे आर्य वैश्य समाजाचे प्रतिनिधी म्हणून आतापर्यंत नगर परिषद सभागृहात कार्यरत होते. आर्य वैश्य समाजाचा नगर परिषदेत दीर्घकाळ प्रभावी राजकीय इतिहास राहिला आहे. या समाजाचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून स्वर्गीय मधुकरराव वट्टमवार यांनी जबाबदारी सांभाळली होती. तसेच शंकरराव चाडावार हे उपनगराध्यक्ष तर दिनकर चाडावार हे नगराध्यक्ष राहिलेले आहेत. मागील अनेक दशकांत आर्य वैश्य समाजाचे प्रतिनिधित्व सातत्याने नगर परिषद सभागृहात राहिलेले आहे. आर्य वैश्य समाज हा भाजपाचा पारंपरिक आणि विश्वासू मतदार वर्ग मानला जातो. त्यामुळे अजय चाडावार यांना सभागृहात सामावून घेतले गेले नाही.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/१३७/२०२५ अकोले दि. ३०/१२/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. सचिन बुधा मधे, रा. शिंगणवाडी**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **यांची मुलगी आरवी सचिन मधे हिचा जन्म दि. ०६/०१/२०२२ रोजी शिंगणवाडी** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **शिंगणवाडी**, ता. अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. सचिन बुधा मधे, रा. शिंगणवाडी**, ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांची मुलगी आरवी सचिन मधे हिचा जन्म दि. ०६/०१/२०२२ रोजी शिंगणवाडी** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **शिंगणवाडी**, ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ३०/१२/२०२५ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

हुकूमावरुन,

**कामगिरी क्लर्क** **तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# निंभोरा गाव सेवा समितीच्यावतीने आग्रही भूमिका

## पठाणकोट एक्सप्रेसच्या पूर्ववत थांब्यासाठी आक्रोश आंदोलन

**रावेर : (समर्थ गांवकरी)**

रावेर तालुक्यातील निंभोरा बुद्रुक येथे थेट मुंबई -अमृतसर या दोन्ही बाजूने जाणाऱ्या पठाणकोट एक्सप्रेसला कोराना काळापूर्वी निंभोरा रेल्वे स्टेशनवर असलेला थांबा पूर्ववत सुरु व्हावा या मागणीसाठी निंभोरा गाव सेवा व परिसर सेवा समितीच्या वतीने तीन टप्प्यांत कृती आंदोलन जाहीर करण्यात आले आहे.

येथील माजी उपसरपंच तथा ज्येष्ठ पत्रकार विवेक ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभिनव आंदोलन उभारण्यात येणार आहे.स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरु असणाऱ्या पठाणकोट या गाडीला निंभोरा या केळी आणि व्यापारी पेठेच्या गावाला दोन्ही बाजूने थांबा होता.




कोरोनानंतर पठाणकोट एक्सप्रेस गाडी येथे थांबणे अचानक बंद करण्यात आल्याने, निंभोरा येथून दररोज सायंकाळी भुसावळ व पुढे मुंबई तसेच सकाळी जळगाव- भुसावळहुन निंभोरा व पुढे बुऱ्हाणपूर-खंडवा असा प्रवास सुसाह्य व्हावा असे प्रवासी, कामधंद्यासाठी ये-जा करणारे चाकरमाने तसेच व्यापारी अशा विविध सोयीच्या प्रवासी वर्गाचे अत्यंत हाल होत आहेत. गेल्या चार-पाच वर्षात यासाठी स्थानिक खासदार व आमदार तसेच रेल्वे अधिकाऱ्यांना अनेकवेळा विनंती निवेदने देऊन सुद्धा याबाबत दुर्लक्ष केले जात असल्याने आता लोकशाही मार्गाने पुन्हा निवेदने दिली जातील.

त्यात पंधरा दिवसात रेल्वे प्रशासनाने दखल न घेतल्यास येत्या २६ जानेवारी रोजीच्या प्रजासत्ताक दिनी रेलरोको आणि थेट जेलभरो आंदोलन करण्यात येणार आहे,लोकशाही मार्गाने जाहीर करण्यात आलेल्या व थांबा बंद झाल्याने सर्वांच्या मनातील रेल्वे प्रशासनाला जाग येण्यासाठी आक्रोश म्हणून पंचक्रोशीतील सर्वच सरपंच, ग्रामपंचायती व ग्रामस्थांनी आक्रोश आंदोलनात सक्रिय सहभागी व्हावे असे आंदोलन प्रमुख व राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा कु.भाग्यश्री विवेक ठाकरे यांनी जाहीर केले आहे.

**तीन टप्प्यात असा आहे कृती कार्यक्रम :-**

(१) शनिवार, ०३ जानेवारी रोजी निंभोरा गाव व परिसर सेवा समितीच्या वतीने पंचक्रोशीतील विविध १० गावांमध्ये मागणी निवेदनावर सह्यांची मोहीम राबविण्यात येईल.

(२) रविवार, ०४ जानेवारी रोजी स्थानिक आमदार, खासदार व मंत्री यांना प्रत्यक्ष आणि सर्व रेल्वे अधिकारी यांना ई -मेलवर २५ जानेवारी पर्यंत दोन्ही बाजूने जाणारा पठाणकोट एक्सप्रेस निंभोरा येथे थांबण्याचा अल्टीमेटम असणारे सह्यांची निवेदने देण्यात येतील.

(३) जर निवेदनाची दखल घेतली नाही तर येत्या २६ जानेवारी रोजी प्रजाकसत्तादिनी निंभोरा येथे रेलरोको व जेलभरो आंदोलन करण्यात येऊन जोपर्यंत थांबा पूर्ववत लागू झाला असे आदेश रेल्वे प्रशासन निर्गमित करीत नाहीत तोपर्यंत जेलभरोमध्ये कारवाई झालेले आंदोलक जामीन घेणार नाहीत,असे या आक्रोश आंदोलनाचे स्वरूप राहणार आहे.

स्वातंत्र्यत्तोर काळात १९५० मध्ये सुरु झालेल्या पठाणकोट एक्सप्रेस या गाडीचे आमच्या गावाशी अनेक अर्थाने लागेबांधे जुळले आहेत.रेल्वे प्रशासनाने आर्थिक फायदा नसल्याचे कारण पुढे करून निंभोरा येथील थांबा रद्द केल्याने गावाची व्यापारपेठ भंग होत आहे.स्थानिक प्रवाशांना भुसावळहुन मुंबईकडे जावे लागते.आम्ही आमच्या शेतजमिनी दिल्यावर रेल्वेमार्ग सुरु झाले नव्हे आता नव्या रेल्वे मार्गाच्या विस्तारिकरणात आणि निंभोरा - खिर्डी व बलवाडी रेल्वेगेटवर उड्डाणपुलाच्या कामात सुद्धा आम्ही स्थानिक शेतकरी विस्थापित असतांना आमच्या गावाच्या रेल्वे स्थानकाचा आम्हाला लाभ का नाही ? असा आमचा सवाल आहे. स्थानिक खासदार आणि सद्याच्या केंद्रीय राज्यमंत्री यांनी निंभोरा येथे पठाणकोट एक्सप्रेसच्या थांब्याच्या मागणीकडे दुर्लक्ष केलेले आहे.त्यामुळे आता आमच्या प्रस्तावित आंदोलनाची रेलरोको व जेलभरो पूर्वीच दखल होणे आवश्यक आहे.

**- विवेक ठाकरे, (माजी उपसरपंच,निंभोरा बु.), प्रणेते, निंभोरा व परिसर गाव सेवा समिती**

# उद्योजक व महिला खेळाडूंचा सन्मान

## 'रिअल हिरो' पुस्तकाचे प्रकाशन



श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती, महान उद्योजक रतन टाटा यांची जयंती तसेच अंध उद्योजक भावेश भाटीया यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीगोंदा येथील अग्रीपंख फाउंडेशनच्या वतीने श्रीगोंदा ते नायगाव अशी १३७ किलोमीटरची 'प्रेरणा सायकल वारी' काढण्यात आली.

या उपक्रमाच्या समारोपप्रसंगी नायगाव येथे उद्योजक व महिला खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. याच वेळी उद्योगविश्वातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांवर आधारित 'रिअल हिरो' या पुस्तकाचे प्रकाशनही झाले.

कार्यक्रमादरम्यान क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले विद्यालयातील विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

हा सन्मान पद्मश्री बीजमाता राहीबाई पोपेरे व उद्योजक भावेश भाटीया यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना राहीबाई पोपेरे म्हणाल्या, "पद्मश्री पुरस्कारानंतर अग्रीपंख फाउंडेशनने पोपेरेवाडीतील शाळा डिजिटल करून माझा सन्मान केला. त्या शाळेतील आठवणी आजही जिवंत आहेत. मानवी आरोग्याच्या दृष्टीने काळी माती व गावरान बियाण्यांचे जतन करणे अत्यावश्यक आहे."

उद्योजक भावेश भाटीया यांनी सांगितले, "भारत रत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणेतून अग्रीपंख फाउंडेशन शाळा, विद्यार्थी व खेळाडूंसाठी सेवाभावी वृत्तीने कार्यरत आहे. उद्योगाची बीजे शालेय जीवनातच पेरणे काळाची गरज आहे."

बाबुराव बोत्रेपाटील म्हणाले, "मराठी माणसाने उद्योगात उतरण्याचे धाडस केले तर तो नक्कीच यशस्वी होईल."

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नवनाथ दरेकर यांनी केले. यावेळी प्रकाश कुतवळ, राजाराम शिंदे, नवनाथ मोहन दरेकर, प्रमोद दिवटे, प्रशांत धुमाळ यांनी आपले विचार मांडले.

कार्यक्रमास तहसीलदार सुरेखा ढोले, नीता भाटीया, सहाय्यक निबंधक नारायण परजणे, गहिनीनाथ ढवळे, प्रा. संजय लाकूडझोडे, मोहन आढाव, सुनील अनभुले, स्वाती जमदाडे, अविनाश वाडकर, शिदू नेवसे, भाऊसाहेब वाघ, ॲड. कावेरी गुरसल, राजकुमार इथापे, किसन वराडे, मारुती वागस्कर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### सन्मानित उद्योजक

बबनराव शेळके, बाबुराव बोत्रेपाटील, प्रकाश कुतवळ, संजय उंडे, बाळकृष्ण पानसरे, प्रताप पवार, सोमनाथ होळकर, अंकुश घाडगे, प्रमोद दिवटे, दत्तात्रय मेहत्रे, नवनाथ दरेकर, राहुल शेलार, सतीश मचे, आनंद जगदाळे, बंडू पवार, विजया गाडीलकर, संतोष नागवडे, चंद्रकांत चौधरी, मयूर गोरखे. महिला खेळाडू प्रांजली धुमाळ, सिद्धी शिर्के. सायकलपटू विजय जगदाळे, रमेश सांळुके, संकेत गांजुरे, विजया लंके, अनिकेत वाबळे.

# रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या दोन वाहनावर कारवाई

नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)




बिलोली तालुक्यात सद्यस्थीत महसूल विभागाकडून रेती उत्खननाचा करण्याचा कुठलाही परवाना नसताना तालुक्यातील मौ. येसगी, हुनगुंदा, सगरोळी येथील मांजरा नदीपत्रातुन रात्रीला मोठ्या प्रमाणात रेतीचा अवैध उपसा केल्या जात आहे, यादरम्यान महसूल पाथकाने ( दि. २९) डिसेंबरच्या मध्ये रात्री कार्ला फाटा व सगरोळी रोडवर अवैध रेतीची वाहतूक करणाऱ्या हायवा व ट्रकला पकडून पुढील कारवाईसाठी तहसील कार्यालयात लावण्यात आले आहे. वरिष्ठ अधिकारी नांदेड महानगर पालिका निवडणूकीच्या कामात मग्र असल्याचा फायदा घेऊन येथील स्थानिकच्या रेती माफियांनी काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून तालुक्यात महसूल विभागाचा कसलाही परवाना नसताना स्थानिक प्रशासनाच्या मूक संमतीने येसगी, हुंगूनदा, सगरोळी येथील मांजरा नदीपत्रातून दररोज रात्रीला अनेक ट्रॅक्टर द्वारे रेतीचा अवैध रित्या उपसा करून जमेल त्या ठिकाणी साठा जमून अनेक हायवा व ट्रकच्या सह्याने इतर राज्यात अवैध वाहतूक केली जाते, या प्रकारा बद्दल अनेक तक्रारी वाढल्याने वरिष्ठ अधिकाऱ्याच्या आदेशाने महसूल विभागाच्या पथकातील अनिल धुळगंडे मंडळ अधिकारी सगरोळी,मअ चंद्रकांत सगरोळी, चौडम, मअ. येसगी ,अनिल देवापुरे मअ कार्ला( बु),बिरप्पा लोणीकर मसे. यांनी सोमवारी रात्रीला सापळा रचून कार्ला फाटा येथे रेतीने भरलेला एमएच १२ एचडी २५०५ क्रमांकचा हायवा तर याच प्रमाणे सगरोळी रोड हिप्परगा येथे रेतीची वाहतूक करणारा एपी २१ टी वाय ४६०८ क्रमांकचा ट्रक पकडून महसूली पंचनाम्या नंतर पोलीस प्रशासनाच्या मदतीने दोनीही वाहन पुढील कारवाईस बिलोली तहसिल कार्यालयात लावण्यात आले आहे.

# भावनांवर नियंत्रण म्हणजेच यशाची गुरुकिल्ली



श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विशेष शिबिराच्या दुसऱ्या दिवशी, दिनांक 28 डिसेंबर 2025 रोजी 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात डीवायएसपी सुनिल महाडिक यांनी 'व्यक्तिमत्त्व विकासातील भावनिक बुद्ध्यांक (Emotional Intelligence)' या विषयावर प्रभावी व प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

व्यक्तिमत्त्व विकास म्हणजे केवळ शैक्षणिक प्रगती नसून, स्वतःच्या भावना ओळखणे, त्या योग्य प्रकारे व्यक्त करणे आणि इतरांच्या भावनांचा आदर राखून वागणे ही खरी जीवनकौशल्ये असल्याचे श्री. महाडिक यांनी स्पष्ट केले. भावनिक बुद्ध्यांक मजबूत असल्यास कोणत्याही परिस्थितीत योग्य निर्णय घेता येतो, तणावावर मात करता येते तसेच नेतृत्वगुण विकसित होतात, असे त्यांनी नमूद केले.

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांमध्ये वाढणारा तणाव, नैराश्य व मानसिक अस्थिरता यावर भावनिक बुद्ध्यांक कसा उपयुक्त ठरतो, याचे सविस्तर विवेचन त्यांनी उदाहरणांसह केले. संवादकौशल्य, आत्मविश्वास, संयम व सकारात्मक दृष्टिकोन या गुणांचा व्यक्तिमत्त्व विकासावर होणारा परिणामही त्यांनी अधोरेखित केला. युवकांनी स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवून समाजाशी सुसंवाद साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

या व्याख्यानामुळे एनएसएस स्वयंसेवकांमध्ये आत्मपरीक्षणाची भावना निर्माण झाली असून, व्यक्तिमत्त्व विकासासाठी भावनिक संतुलन किती आवश्यक आहे, याची जाणीव सर्वांना झाली आहे. कार्यक्रमास एनएसएस कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन स्वयंसेवकांनी केले. या व्याख्यानमालेमुळे एनएसएस शिबिराचा शैक्षणिक व वैचारिक उद्देश अधिक प्रभावीपणे साध्य झाल्याचे चित्र दिसून आले.

# संदीप गायकवाड कांस्यपदकाचा मानकरी

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)



महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय तसेच मोटेवाडी कुस्ती केंद्र, पाटस येथील खेळाडू पैलवान संदीप गायकवाड याने औरंगाबाद येथे दि. 18 व 19 डिसेंबर 2025 रोजी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघटनेच्या वतीने आयोजित 17 वर्षांखालील फेडरेशन राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत 80 किलो वजनगटात उत्कृष्ट कामगिरी करत कास्यपदक पटकावले. संदीप गायकवाड हा मोटेवाडीचे सरपंच व नामवंत कुस्ती प्रशिक्षक वस्ताद संभाजी खडके यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करीत आहे.

# रयत स्पर्धा परीक्षा अकॅडमीचे उद्घाटन

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)




महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात रयत स्पर्धा परीक्षा अकॅडमीचे उद्घाटन तहसीलदार सचिन डोंगरे यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. बाबासाहेब भोस हे होते.

उद्घाटनप्रसंगी तहसीलदार सचिन डोंगरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, कठीण परिश्रम, सातत्य आणि योग्य नियोजन केल्यास स्पर्धा परीक्षांमध्ये यश निश्चितपणे मिळू शकते.

यावेळी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य महावीर पटवा उपस्थित होते. त्यांनी अकॅडमीच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. महादेव जरे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, येणाऱ्या काळात या अकॅडमीतील विद्यार्थी एम.पी.एस.सी. आणि यु.पी.एस.सी.च्या निवड यादीत निश्चितपणे झळकतील. तसेच अकॅडमीसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रयत स्पर्धा परीक्षा अकॅडमीचे समन्वयक प्रा. अनिल ढवळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सोनाली रायकर यांनी केले, तर आभार उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी मानले.

यावेळी उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी डॉ. हरीभाऊ वाघीरे, प्रा. राहुल ठवाळ, प्रा. संदीप ससाणे, प्रा. रत्नाकर झिटे, प्रा. संजय फटे, प्रा. प्रकाश केसरी, प्रा. उषा बोरुडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# ठाणे मनपा सार्वत्रिक निवडणूक संभाव्य दुबार मतदारांची छाननी पूर्ण

## ६७ हजाराहून अधिक मतदारांच्या नावासमोरील स्टार चिन्ह हटविणार

ठाणे : (समर्थ गांवकरी)




ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीची पडताळणी करुन संभाव्य दुबार मतदारांची सखोल छाननी पूर्ण करण्यात आली आहे. या प्रक्रियेत एकूण 83,645 संभाव्य दुबार मतदारांची तपासणी करण्यात आली. मतदार यादी पडताळणीत 67071 मतदारांची नावे व फोटो एकमेकांशी जुळत नाहीत. अर्थात सदर मतदार 'दुबार मतदार' नाहीत. त्यामुळे या मतदारांच्या नावासमोरील स्टार (**) चिन्ह हटविण्यात येणार आहे. यामुळे या मतदारांना कोणत्याही अडथळ्याविना मतदानाचा हक्क बजावता येणार असल्याची माहिती उपायुक्त (निवडणूक) उमेश बिरारी यांनी दिली. दरम्यान मतदार यादीत नाव व फोटो पूर्णतः समान असलेले 16,574 मतदार प्रत्यक्ष दुबार असल्याचे स्पष्ट झाले आहे. अशा मतदारांच्या नावासमोर स्टार (**) चिन्ह कायम ठेवण्यात येणार असून, सदर मतदारांच्या नावापुढे 'दुबार मतदार' असा शिक्का मतदार यादीत असणार आहे.

अशा मतदारांना मतदान केंद्रावर विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून देऊन मतदान करता येईल. दुबार मतदान टाळण्यासाठी त्यांच्यावर विशेष लक्ष ठेवले जाणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. संबंधित मतदाराने आपण एकाच ठिकाणी आणि एकदाच मतदान करीत असल्याचे लेखी हमीपत्र दिल्यानंतर मतदानाची परवानगी देण्यात येणार असल्याची माहिती उपायुक्त उमेश बिरारी यांनी दिली.

निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखणे, दुबार व बनावट मतदानास आळा घालणे तसेच पात्र मतदाराचा हक्क सुरक्षित ठेवणे, या उद्देशाने ही छाननी प्रक्रिया राबविण्यात आली आहे. मतदार यादी अचूक व दोषमुक्त असणे लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याने, प्रशासनाकडून ही कार्यवाही काटेकोरपणे करण्यात येत आहे. या सुधारणांमुळे ठाणे महानगरपालिका निवडणूक अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि सुरळीतपणे पार पडेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# शाळेत वृक्षारोपण उत्साहात

आळंदी: (समर्थ गांवकरी)

पुणे जिल्हा परिषद व सह्याद्री देवराई फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने खेड तालुक्यातील धानोरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वृक्षारोपण व मार्गदर्शक कार्यक्रम उत्साहात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला सह्याद्री देवराई फाऊंडेशनचे संस्थापक तथा सुप्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. आजचे विद्यार्थी हेच उद्याच्या सक्षम महाराष्ट्राचे, सक्षम भारताचे आदर्श नागरिक होणार आहेत. या विद्यार्थ्यांच्या मनात निसर्गाबाबत आदराची भावना व पर्यावरण संवर्धनाचा संस्कार पेरणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू होता. विद्यार्थ्यांच्या प्रचंड प्रतिसादाने हा हेतू साध्य झाला याबाबत पुणे जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी आनंद व्यक्त केला.

# शिवसेनेचे प्रचाराचा नारळ फोडून जोरदार शक्तीप्रदर्शन

ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)




ठाणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिवा शहरात प्रभाग २७ मध्ये शिवसेनेकडून प्रचाराचा नारळ फोडून जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आले. राजकीय वातावरण तापू लागल्याने प्रभाग क्रमांक २७ मध्ये शिवसेनेचे मा. नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या नेतृत्वाखाली दिवा स्टेशन पश्चिम येथील कुलस्वामिनी मंदिरात प्रचाराचा नारळ फोडून निवडणूक प्रचारचा शुभारंभ करण्यात आला. प्रसंगी काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीत शेकडो महिलांसह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व शिवसैनिकांची अलोट गर्दीने परिसर भगवामय झाला होता.

प्रसंगी मिरवणुकीत शिवसेनेचे सर्व शाखाप्रमुख, पदाधिकारी, शिवदूत मोठ्या संख्येने महिला आघाडीच्या कार्यकर्त्या आणि शिवसैनिक सहभागी झाले होते. हातात भगवे ध्वज घेऊन निघालेल्या या रॅलीने संपूर्ण प्रभागात शिवसेना जिंदाबाद घोषणा होत होत्या. प्रसंगी शिवसनेचे उपशहर प्रमुख शैलेश मनोहर पाटील यांनी विजयाचा ठाम विश्वास व्यक्त केला असून दिव्यातील जनतेचा शिवसेनेने केलेल्या विकास कामावर पूर्ण विश्वास ठेवला असून राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिव्यात केलेल्या विकासकामांची पावती म्हणून येथील जनता पुन्हा एकदा भगव्यालाच कौल देईल व दिवा शहराचा कायापालट करण्यासाठी शिवसेनेचे सर्वाधिक नगरसेवक निवडून येतील असा ठाम विश्वास पाटील यांनी व्यक्त केला. सदर सोहळ्याला शिवसेनेचे स्थानिक नेतृत्व एकवटलेले पाहायला मिळाले. प्रसंगी उपशहर प्रमुख शैलेश पाटील, आदेश भगत, अमर पाटील, दिपाली भगत, उमेश भगत, भालचंद्र भगत, गुरुनाथ पाटील यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी व शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.




ठाणे : दिव्यात भागणे प्रतिष्ठान आयोजित भव्य क्रिकेटचे सामने आयोजित करण्यात आले होते. प्रसंगी एकूण १६ टीम सहभागी झाल्या होत्या. प्रसंगी मोफत आरोग्य शिबीर तसेच लकी ड्रॉ तून दुचाकी जिकण्याची संधी उपलब्ध करण्यात आली होती. सदर सामन्यात श्री.गावदेवी टेटवली क्रिकेट संघाने प्रथम तर वैष्णवी स्पोर्ट्स, दाभील संघाने द्वितीय पारितोषिक पटकावले. प्रसंगी भागणे प्रतिष्ठानच्या आयोजकांकडून सर्व सहभागी संघाचे अभिनंदन करण्यात आले. (फोटो - संतोष पडवळ)



# इथापे आयटीआयमध्ये वीर बालकांचा सन्मान.!





संगमनेर: (समर्थ गांवकरी)

संगमनेर मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संगमनेर, अंतर्गत असणाऱ्या वामनराव इथापे खाजगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,वेल्हाळे या ठिकाणी वीर बाल दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्रालय महाराष्ट्र राज्य मुंबई तसेच ॲड.मंगल प्रभात लोढा (मंत्री कौशल्य विभाग म.राज्य मुंबई) यांचे संकल्पनेतून समाजातील वीर बालकांचा शोध घेऊन त्यांचा गौरव करण्याचा भाग म्हणून धाडसीकृती या विभागात अद्वितीय कार्य कौशल्य व प्रेरणादायी कामगिरी गौरवार्थ कु. ओम सोमनाथ आहेर (गणोरे) व कु.प्रज्वल संतोष उगले (डोंगरगाव)या दोन वीर बालकांचा सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविकेतून संस्थेचे प्राचार्य श्री सुशांत आरोटे यांनी दोन्ही वीर बालकांनी आपल्या शैक्षणिक सहली दरम्यान पहाटे बसला झालेल्या अपघातातून आपल्यासह आपल्या बसमधील सुमारे 30 ते 40 जणांचा वेळीच प्रसंगावधान राखून,गाडीचा चालक बेशुद्ध पडलेला असताना, पुढील काही अनर्थ घडण्याच्या आतच बसवर ताबा मिळवत बस कंट्रोल करून सर्वांचा जीव वाचवला.

या कार्याची दखल घेत कु.ओम सोमनाथ आहेर आणि कु.प्रज्वल संतोष उगले या दोन वीर बालकांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री प्रदीप सोनवणे हे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की, समाजातील अशा असामान्य कामगिरी करणारे बालक हे कौतुकापासून दूर असताना त्यांचा शोध घेऊन त्यांचे कौतुक करणे हे त्यांच्यासाठी त्यांना निश्चितच पुढील आयुष्यात प्रेरणा देण्यासाठी आणि भविष्यात त्यांचे हातून अशाच प्रकारे देशाची, समाजाची सेवा घडवण्याच्या दृष्टीने हे कौतुक वीर बालकांना कायम प्रेरणा देत राहील.,असा आशावाद व्यक्त करत असतानाच, त्यांनी दोन्ही वीर बालकांच्या पालकांचेही विशेष कौतुक करत अभिनंदन केले.

या कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री अशोक राव इथापे, कार्यकारी संचालक श्री अनिकेत इथापे, संस्थेच्या विश्वस्त संस्थेच्या विश्वस्त तेजस्विनी इथापे,आय.टी.आय चे प्राचार्य सुशांत आरोटे,वीर बालकांचे पालक श्री सोमनाथ आहेर, श्री संतोष उगले, प्रमुख वक्ते श्री प्रदीप सोनवणे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री ओमकार हांडे,श्री सचिन खाडे, सौ मयूर घुले, श्री संजय रहाणे, श्री अश्विन कानवडे, यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य सुशांत आरोटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री अविनाश वर्पे व आभार श्री सचिन खाडे यांनी मानले.

# मतदान प्रक्रियेचे प्रशिक्षण पूर्ण

## मतदान प्रक्रियेसाठी महानगरपालिकेकडून दोन हजारांवर कर्मचारी नियुक्त



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महानगरपालिकेच्या १५ जानेवारी रोजी होत असलेल्या निवडणुकीसाठी मतदान प्रक्रियेची तयारी महानगरपालिका प्रशासनाकडून सुरू झाली आहे. मतदान प्रक्रियेसाठी केंद्राध्यक्ष, सहाय्यक केंद्राध्यक्ष व इतर कर्मचारी अशा सुमारे दोन हजारांवर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांना सोमवारी नंदनवन लॉन येथे पहिल्या टप्प्याचे प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली. शहरात १७ प्रभागांच्या ६८ जागांवर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या मतदान प्रक्रियेसाठी ३४५ केंद्र असणार आहेत. त्याची यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. प्रत्येक मतदान केंद्रात केंद्राध्यक्ष, सहाय्यक केंद्राध्यक्ष व इतर कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करण्यात येणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार या कर्मचाऱ्यांना आयुक्त यशवंत डांगे व अतिरिक्त आयुक्त विजयकुमार मुंडे यांनी सोमवारी प्रशिक्षण दिले. यात मतदान प्रक्रिया कशी असेल, ईव्हीएम कसे हाताळायचे, ईव्हीएम सील कसे करायचे याची प्रात्यक्षिक व सविस्तर माहिती देण्यात आली. प्रशिक्षणासाठी सुमारे १८०० कर्मचारी उपस्थित होते. गैरहजर कर्मचाऱ्यांवर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.  दरम्यान, महानगरपालिकेला मतदान प्रक्रियेसाठी ८०० कंट्रोल युनिट, १६०० बॅलेट युनिट (ईव्हीएम) उपलब्ध झाले आहेत. मेमरी कार्ड, पॉवर बँकही पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. या मतदान यंत्रांची पहिल्या टप्प्याची तपासणी केली जात आहे. तसेच, मतदानासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया व ईव्हीएम हाताळून माहिती घेता यावी, यासाठी दुसऱ्या टप्प्यात प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :- सौ. सारिका हनुमंत भुतकर यांनी वार्ड क्रमांक ७ (क), सर्वसाधारण महिला गटातून अर्ज दाखल (छायाचित्र- उदय जोशी)



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :- मनिषा काळे (७ क) ( सर्वसाधारण महिला) यांनी भाजपा उमेदवारी अर्ज दाखल केला.(छाया- उदय जोशी)



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :- समाजसेविका सौ. शालिनी वाबळे यांनी ३ ब, क याकरिता आज अर्ज दाखल केला. (छाया- उदय जोशी)

# दिलदार सिंग बिर यांचा उमेदवारी अर्ज दाखल

- पंचवीस वर्षापासून शिवसैनिक असलेल्या पक्षाने उमेदवारी देऊन न्याय दिला- दिलदार सिंग बिर



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

गेल्या पंचवीस वर्षापासून स्व.बाळासाहेब ठाकरे यांची प्रेरणा घेऊन स्वर्गीय अनिल भैय्या राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसैनिक म्हणून नगर शहरात कार्य केले आहे.शिवसैनिक म्हणून जनतेची नाळ जोडल्याने जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी सदैव तत्पर असतात. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी व महानगर प्रमुख किरण काळे यांनी पक्षाचे उमेदवारी देऊन न्याय दिला आहे.यामुळे ठाकरे घराण्याशी एकनिष्ठ राहून स्वर्गीय अनिल भैय्या राठोड यांचे विचार तळागाळात पोहोचविण्याचे कार्य करू. स्वर्गीय अनिल भैय्या सांगितल्याप्रमाणे संपूर्ण संरक्षण संपूर्ण सुविधा व निरंतर सेवा हे उद्दिष्ट ठेवून प्रभागाच्या विकासासाठी कटिबद्ध राहू. प्रभाग विकास हेच आमचे ध्येय असो जनतेशी प्रश्न सोडविण्यासाठी सदैव तत्पर राहू.असे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे अधिकृत उमेदवार दिलदार सिंग बिर यांनी सांगितले आहे. प्रभाग क्रमांक 10अ -गौरव ढोणे,10 ब-संपदा म्हस्के,10 क-शीतल भिंगारदिवे,10 ड-दिलदार सिंग बीर यांना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाने अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केले आहे. यावेळी दिलदार सिंग बिर,गौरव ढोणे,सोमनाथ लगडे,किरण डफळ,बबलु राजपुत,मुन्ना भिंगारदिवे,निलेश जव्हेरी,किशोर लगडे,जसमित सिंग राजपुत आदी मान्यवर उपस्थित होते.

# रुपेश लोखंडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी प्रभाग क्रमांक ९ अ मधील राखीव अनुसूचित जाती प्रवर्गासाठी चर्मकार विकास संघाचे  युवा शहराध्यक्ष मा. श्री.रुपेश लोखंडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. गोरगरीब जनतेचे प्रश्न व नागरी समस्या सोडविण्यासाठी तसेच जनसेवा करण्यासाठी उमेदवारी करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच सर्वसामान्य कार्यकर्ता असल्याने सामान्यांच्या प्रश्नांची जाण आहे. प्रभागाचा विकास हेच ध्येय ठेवून नगरसेवक पदाचा अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला आहे. असे प्रभाग ९अ मधील रुपेश लोखंडे यांनी सांगितले आहे.

# केडगावात राजकीय गणितं पालटली सेनेला मोठा धक्का

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर  भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या उपस्थितीत केडगावात दोन महत्त्वाचे प्रवेश झाले. यामध्ये शिवसेनेचे माजी नगरसेवक अमोल येवले यांचा समावेश असल्याने स्थानिक राजकारणात खळबळ उडाली आहे. त्यांच्या प्रवेशामुळे शिवसेनेला मोठा धक्का बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. यावेळी विजु पठारे यांनीही प्रवेश करत आपली भूमिका स्पष्ट केली. या दोन्ही प्रवेशांमुळे केडगावातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता असून, आगामी मनपा निवडणुकीत याचे पडसाद उमटतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.  स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, पुढील काळात आणखी हालचाली वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. केडगावात झालेल्या या घडामोडीनंतर राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले असून शिवसेनेचे माजी नगरसेवक अमोल येवले यांचा भाजप मध्ये प्रवेश झाल्याने पक्षाची स्थानिक पातळीवरील ताकद वाढणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. प्रभाग क्रमांक १६ मधून उमेदवारी जाहीर झाल्याने भाजप अधिक आक्रमक पवित्र्यात उतरल्याचे चित्र असून, येत्या मनपा निवडणुकीत हा प्रभाग निर्णायक ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



# विक्रम राठोड यांचा ठाकरेंना ‘जय महाराष्ट्र’!

## शिंदेंच्या शिवसेनेत सक्रिय



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महानगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत असताना सोमवारी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने महायुतीला जय महाराष्ट्र करत स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतला. यानंतर लगेचच दिवंगत नेते माजी आमदार अनिल राठोड यांचे चिरंजीव, ठाकरेंच्या शिवसेनेचं पदाधिकारी विक्रम राठोड यांनी शिंदेंच्या शिवसेनेत सक्रिय होत असल्याचे जाहीर केले.

राठोड यांचा अधिकृत पक्ष प्रवेश ८ जानेवारीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगरमधील जाहीर सभेत होणार आहे.

दरम्यान विक्रम राठोड यांनी भूमिका मांडली. ते म्हणाले की, नगर शहरात २५ वर्ष माजी आमदार स्व. अनिल राठोड यांनी शिवसेना पक्ष वाढवला. धनुष्यबाण आणि राठोड यांचे अतूट नाते होते. त्यामुळेच मी आज ओरिजनल शिवसेनेत आलो आहे. ठाकरेंच्या शिवसेनेने अनिल राठोड यांच्या निधनानंतर नगर शहरात हवे तितके लक्ष दिले गेले नाही. आम्ही अनेक वेळा उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन चर्चा केली.

जबाबदारी सोपविण्याची मागणी केली. परंतु पुढे काहीच झाले नाही. विधानसभा निवडणुकीत नगर शहराची जागा शिवसेनेची असताना श्रीगोंद्याची जागा घेऊन नगर शहराची जागा सोडण्यात आली. आम्ही पक्षावर निष्ठा ठेवली पण पक्ष नेतृत्वाने तितका प्रतिसाद दिला नाही.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कार्यकर्त्याला ताकद देणारे नेते आहेत. त्यामुळेच त्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्णय घेतला आहे.

### 'राठोड यांचे शिर्डीतच ठरले'

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी शिर्डी येथे शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. त्याचवेळी विक्रम राठोड यांनी शिंदे यांची भेट घेऊन पक्ष प्रवेशाची चर्चा केली होती. त्यानुसार त्यांचा पक्ष प्रवेश होणार आहे, असे शहरप्रमुख सचिन जाधव यांनी सांगितले.

# महाराष्ट्रात कोबी बाजारभाव चांगले

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील भाजीपाला बाजारात २० डिसेंबर २०२५ रोजी कोबीच्या दरांमध्ये संमिश्र स्थिती पाहायला मिळाली. काही बाजार समित्यांमध्ये आवक वाढलेली असताना, शहरांतील मोठ्या बाजारांमध्ये मागणी स्थिर असल्यामुळे दर फारसे घसरले नाहीत. दर्जेदार, घट्ट आणि ताज्या कोबीला तुलनेने चांगला भाव मिळाल्याचे चित्र आहे. आज मुंबई, कोल्हापूर, नागपूर, पुणे, अमरावती आणि सातारा हे बाजार कोबी व्यवहारासाठी महत्त्वाचे ठरले.

प्रमुख बाजारांतील आजचे कोबी दर - कोल्हापूर - कोबीची मध्यम आवक नोंदवली गेली. सर्वसाधारण दर : ₹१००० कमाल दर ₹ १५०० पर्यंत.

मुंबई (लोकल) राज्यातील सर्वात मोठ्या भाजीपाला बाजारात कोबीची मोठी आवक झाली.

# महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रभाग १ ते १७ उमेदवारांची नावे जाहिर

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील महानगरपालिकेच्या आज शेवटच्या दिवशी अखेर महायुती मधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अधिकृत उमेदवारांची यादी समोर आली असून ३४ जागेवर राष्ट्रवादी काँग्रेसने आपले अधिकृत उमेदवार उभे केले आहेत.

**प्रभाग क्रमांक १ :** (अ )डॉ. सागर अर्जुन बोरुडे राष्ट्रवादी (ब) ज्योती सतीश ढवण राष्ट्रवादी (क) दिपाली नितीन बारस्कर राष्ट्रवादी (ड )संपत विजय बारस्कर राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक २ :** ( ब )महेश रघुनाथ तवले राष्ट्रवादी ( क) संध्या बाळासाहब पवार राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक ३ :** ( ब) गौरी अजिक्य बोरकर राष्ट्रवादी ( क ) ज्योती अमोल गाडे राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक ५ :** ( अ )काजल गोरख भोसले राष्ट्रवादी (क )हरप्रीतकौर जगजीतसिंग गंभीर राष्ट्रवादी ( ड )मोहित प्रदीप पंजाबो राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक ८ :** (अ )सुनिता किसन भिंगारदिवे राष्ट्रवादी ( क )कुमार बबनराव वाकळे राष्ट्रवादी (ड) बाबासाहेब संतराम नागरगोजे राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक ९ :** ( अ )किरण रमेश दाभाडे राष्ट्रवादी (क )सीमा युवराज शिंदे राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक ११ :** (अ) सागर किरण शिंदे राष्ट्रवादी ( क )आशा किशोर डागवाले राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक १२ :** ( अ) आरती संग्राम रासकर राष्ट्रवादी ( ब ) संध्या रमेश घोलप राष्ट्रवादी

प्रभाग क्रमांक १३ (अ )सुरेश लक्ष्मण बनसोडे राष्ट्रवादी ( ब) सुजाता महेंद्र पडोळे राष्ट्रवादो ( क )अनिता विपुल शेटीया राष्ट्रवादी ( ड )अविनाथ हरिभाऊ घुले राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक १४ :** ( अ )प्रकाश बाबुराव भागानगरे राष्ट्रवादी (ब )सुनिता भगवान फुलसौंदर राष्ट्रवादी ( क )माना संजय चोपडा राष्ट्रवादी ( ड )गणेश पुंडलिक भोसले राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक १५ :** ( अ )पोर्णिमा विजय गव्हाळे राष्ट्रवादी (क )गीतांजली सुनील काळे राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक १६ :** (अ ) सुनिता महेंद्र कांबळे राष्ट्रवादी ( ब )वर्षा सुजित काकडे राष्ट्रवादी

**प्रभाग १७ :** (अ) मयूर कनैय्यालाल बांगरे राष्ट्रवादी ( ब )अश्विनी सुमित लोंढे राष्ट्रवादी









अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :- (भाजपा) करन कराळे यांनी प्रभाग क्रमांक सहा करउमेदवारी अर्ज दाखल केला.

# पूर्वनियोजित कट रचून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप

- युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे
- एमआयडीसीत गुन्हेगारी टोळीची दहशत
- कठोर कारवाईसाठी जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन
- एमआयडीसीतील गुंडगिरी व दहशत हद्दपार करण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

एमआयडीसी परिसरात दिवसेंदिवस गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत असून त्याचाच एक गंभीर आणि धक्कादायक प्रकार समोर आला आहे. चिरंजीव दत्तात्रय गाढवे व आकाश उर्फ चिट्ट्या बबन दंडवते यांनी संगनमताने माझा व माझ्या कुटुंबाचा जिवे मारण्याचा पूर्वनियोजित कट रचला असून, शनिवारी जीवघेणा हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचा गंभीर आरोप स्वराज्य कामगार संघटनेचे सचिव तसेच युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांनी सोमवारी (दि.२९ डिसेंबर) घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला आहे.

यासंदर्भात सोमवारी (दि. २९ डिसेंबर) जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रार निवेदन देण्यात आले असून, पोलीस प्रशासन गांभीर्याने दखल घेत नसल्याने गुंडशाही वाढत असल्याचा आरोप त्यांनी केला. एमआयडीसीतील गुंडगिरी व दहशत हद्दपार करण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

योगेश गलांडे हे एमआयडीसी परिसरात स्वराज्य कामगार संघटनेचे सचिव तसेच युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत असून, कामगारांचे प्रश्न, अडचणी आणि सामाजिक कार्यासाठी ते सातत्याने सक्रिय आहेत. याच कार्याचा राग धरून चिरंजीव गाढवे याने माझ्यावर हल्ल्याचा कट रचल्याचा आरोप त्यांनी पत्रकार परिषदेत केला.

दि. २७ डिसेंबर रोजी सकाळी सनफार्मा चौकात बिगर नंबरच्या निळ्या रंगाच्या बलीनो कारने गलांडे यांच्या फॉर्च्युनर वाहनाला अडवण्यात आले. बंदूक व कोयत्याच्या जोरावर जिवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. या हल्ल्यात त्यांच्या वाहनाची काच व बोनेटचे नुकसान झाले. प्रसंगावधान राखत गाडी पळवून थेट एमआयडीसी पोलीस स्टेशन गाठल्यामुळे जीव वाचल्याचे गलांडे यांनी सांगितले. या घटनेप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

यानंतर, दंडवते बंधू चालवत असलेल्या एमआयडीसीतील हॉटेल ब्लिस येथे गेल्या १० ते १२ दिवसांपासून गलांडे व त्यांच्या कुटुंबाच्या जिवे मारण्याचा कट शिजत असल्याची माहिती एका व्यक्तीने नाव न सांगण्याच्या अटीवर दिल्याचे गलांडे यांनी सांगितले. दंडवते विरोधात सुरू असलेली कोर्टातील केस मागे घ्यावी, यासाठी दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने हा हल्ला करण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

या संपूर्ण कटाचा पर्दाफाश करण्यासाठी हॉटेल ब्लिस येथील सीसीटीव्ही फुटेज तसेच चिरंजीव गाढवे व आकाश दंडवते यांचे मागील १५ दिवसांचे कॉल डिटेल रेकॉर्ड (CDR/SDR) तपासण्याची मागणी त्यांनी केली. आपल्यावर खोट्या खंडणी व चोरीच्या गुन्ह्यांत गोवण्यात आल्याचा आरोपही गलांडे यांनी केला. चोरीच्या प्रकरणात पोलीस प्रशासनाने ‘ब समरी’ मंजूर केल्याने खोटे गुन्हे दाखल करण्यात आल्याचे स्पष्ट झाले असल्याचे त्यांनी नमूद केले.

कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून काम सुरू असून, हे काम थांबवण्यासाठीच आपल्यावर दबाव आणला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

# अहिल्यानगर जिल्हा संघ कुस्ती निवड चाचणीत सर्वोदय विद्यालयाच्या दोन मल्लांना सुवर्णपदक!

**राजूर : (समर्थ गांवकरी)**



पुढील महिन्यात होणाऱ्या राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठीची अहिल्यानगर जिल्हा संघ कुस्ती निवड चाचणी स्पर्धा अहिल्यानगर येथे नुकतीच पार पडली. या स्पर्धेत राजूर येथील सत्यनिकेतन संस्था संचलित सर्वोदय विद्यालयाच्या दोन कुस्तीपटूंनी घवघवीत यश मिळवत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे.

राजूर येथील गुरुवर्य रा. वि. पाटणकर सर्वोदय विद्यामंदिर, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथील विद्यार्थी कु. सदगीर सार्थक वाळू (इयत्ता १० वी) यांनी ५७ किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावले. तसेच कातळापूर येथील नानासाहेब विठोबा देशमुख सर्वोदय विद्यामंदिर, कातळापूर येथील विद्यार्थी कु. दहिफळे रघुवीर चंद्रशेखर (इयत्ता १० वी) यांनी ३८ किलो वजन गटात सुवर्णपदक मिळवले.

या दोन्ही कुस्ती मल्लांची राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाल्याने परिसरात त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशासाठी खेळाडूंना कुस्ती साई केंद्राचे संचालक तथा आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षक तानाजी नरके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच विद्यालयातील क्रीडा शिक्षक व प्रशासनाकडूनही त्यांना सतत प्रोत्साहन मिळाले. यामध्ये प्राचार्य भाऊसाहेब बनकर, मुख्याध्यापक संपत धुमाळ, जालिंदर आरोटे आणि विनोद तारू यांचे विशेष मार्गदर्शन लाभल्याचे सांगण्यात आले.

या उल्लेखनीय यशाबद्दल सत्यनिकेतन संस्थेचे अध्यक्ष ॲड. मनोहरराव देशमुख, सचिव एम. एल. मुठे, माजी सचिव टी. एन. कानवडे, कोषाध्यक्ष विवेकजी मदन, संचालक मिलिंदशेठ उमराणी, प्रकाश टाकळकर, एस. टी. येलमामे, विजय पवार, श्रीराम पन्हाळे, अशोक मिस्त्री, प्रकाश महाले यांच्यासह प्राचार्य डॉ. बी. वाय. देशमुख, भाऊसाहेब बनकर, उपप्राचार्य दिपक बुऱ्हाडे, मुख्याध्यापक संपत धुमाळ, मधुकर मोखरे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थांनी खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.



# गणोरे केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा : जि. प. प्राथमिक शाळा पिंपळगाव निपाणीच्या विद्यार्थ्यांचा दिमाखदार सत्कार!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

गणोरे केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव निपाणी येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केल्याबद्दल विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शक शिक्षकांचा भव्य सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम शालेय व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत व सर्व ग्रामस्थांच्या समन्वयाने कै. राधाबाई व खंडू आप्पाजी भोसले बहुउद्देशीय सभागृहात आयोजित करण्यात आला होता. समारंभाचे अध्यक्षस्थान शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन तोरमल यांनी भूषविले. यावेळी ग्रामपंचायत सरपंच दत्तात्रय डगळे, पत्रकार दत्तात्रय हासे, ग्रामपंचायत सदस्य नामदेव गोर्डे, माजी उपसरपंच तथा शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष अनिल वाकचौरे, माध्यमिक विद्यालय शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणपत तोरमल, बाळासाहेब तोरमल, शरद गोर्डे, दिनकर वाकचौरे, संदीप उघडे, बाबासाहेब जाधव, समिती सदस्या सौ. मोनिका गोर्डे तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या क्रीडा यशाचे व शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे कौतुक करत पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष नितीन तोरमल यांनी तालुका व जिल्हास्तरावर क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष बक्षिसे जाहीर करून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री भाऊसाहेब वाकचौरे, शिक्षक सुभाष बगनर, रामचंद्र खतोडे, लक्ष्मण मधे, सौ. शारदा गीते, सौ. निकिता हासे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विज्ञान पदवीधर शिक्षक सुभाष बगनर सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन रामचंद्र खतोडे सर यांनी मानले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल उपस्थित सर्वांनी अभिनंदन करून भविष्यातील स्पर्धांसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# निघोजच्या महिलांचा टोकाचा निर्णय!

**पारनेर/निघोज : (समर्थ गांवकरी)**




पारनेर तालुक्यातील निघोज येथे थर्टीफर्स्टच्या निमित्ताने दारू पिऊन गावात झिंगत फिरणाऱ्यांविरोधात महिलांनी अत्यंत कठोर आणि वेगळा निर्णय घेतला आहे. दारू पिऊन सार्वजनिक ठिकाणी धिंगाणा घालणाऱ्या तळीरामांची गाढवावरून धिंड काढण्याचा इशारा देत महिलांनी संपूर्ण गावात दारूबंदीचा निर्धार व्यक्त केला आहे.

निघोज गावात २०१६ साली महिलांनी एकत्र येत मतदानाद्वारे परवानाधारक दारू दुकाने बंद केली होती. मात्र, त्यानंतरही गावातील काही हॉटेल्स व धाब्यांवर सर्रास अवैध दारू विक्री सुरू असल्याचा आरोप महिलांनी केला आहे. याबाबत वेळोवेळी जिल्हा पोलिस प्रशासन यांच्याकडे तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याने महिलांमध्ये तीव्र संताप आहे.

दारूबंदीविरोधी महिला समितीच्या सदस्यांनी सांगितले की, दारूमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत असून महिलांना व मुलांना मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे.

त्यामुळे आता फक्त तक्रारी करून उपयोग नाही, तर प्रत्यक्ष कृतीद्वारे तळीरामांना अद्दल घडवावी लागेल, असा ठाम निर्णय घेण्यात आला आहे.

मंगळवारी थर्टीफर्स्टच्या पार्श्वभूमीवर निघोज गावात महिलांनी फेरी काढत दारूबंदीबाबत जनजागृती केली आणि दारू पिऊन गावात फिरणाऱ्यांना थेट इशारा दिला. "थर्टीफर्स्टचे निमित्त करून जर कोणी दारू पिऊन गावात गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला, तर त्याची गाढवावरून धिंड काढली जाईल," असा स्पष्ट संदेश महिलांनी दिला.

# दिल्ली पेठ येथे बिबट्या जेरबंद

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

आगरपेठ, शुक्रवार पेठ, हलवाई गल्ली, दिल्ली पेठ, साई गणेश उत्सव मंडळ व शहरात बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे पिंजरा लावण्याची मागणी सातत्याने ग्रामस्थांनी जुन्नर वन विभाग कार्यालय येथे केली. येथील ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, तरुण वर्ग व महिला भगिनी पहाटे, संध्याकाळी व रात्री घराच्या बाहेर कोणीही पडत नव्हते. यामुळे या परिसरामध्ये वारंवार बिबट्या दिसल्यामुळे भीतीचे वातावरण पसरले होते. यानंतर जुन्नर वन विभाग कार्यालय यांनी दिल्ली पेठ परिसरात बिबट्या पकडण्यासाठी चार पिंजरे ताबडतोब लावण्यात आले. दिल्ली पेठ येथील एका पिंजऱ्यामध्ये काल रात्री ते पहाटे पर्यंत पिंजरा मध्ये बिबट्या जेरबंद झाला.

# पौष शुद्ध एकादशी निमित्त अखंड हरिपाठ सप्ताहास मंगलारंभ!

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



पौष शुद्ध एकादशीच्या पावन पर्वावर आयोजित अखंड हरिपाठ सप्ताहाची सुरुवात श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. या धार्मिक सोहळ्याला ग्रामस्थांनी मोठ्या भक्तिभावाने उपस्थिती लावली.

याप्रसंगी श्री रामजीभाई देवजीभाई पटेल, श्री पांडुरंग बळीराम चिकणे, श्री तुषार लक्ष्मण चिकणे, श्री विजय पांडुरंग चिकणे, श्री सुनील रामचंद्र चिकणे तसेच अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

पौष शुद्ध एकादशी हा दिवस विष्णुभक्तीसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी उपवास, नामस्मरण व भक्तीभावाने केलेली उपासना पुण्यदायी ठरते. अखंड हरिपाठ सप्ताह म्हणजे भगवान विष्णूंच्या नामाचा सात दिवस अखंड जप करणारा विशेष धार्मिक उपक्रम असून, त्यामुळे भक्तांची अंतःशुद्धी होते तसेच मानसिक व शारीरिक शांती लाभते. यावेळी बोलताना नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला म्हणाले की, अखंड हरिपाठ सप्ताहामुळे अंतःकरण शुद्ध होते, सद्गुणांची वाढ होते आणि जीवन योग्य मार्गावर नेण्याची प्रेरणा मिळते. सात दिवसांच्या या नामस्मरणातून भक्तांच्या जीवनातील दुःख, चिंता व कष्ट दूर होतात.

याप्रसंगी पांडुरंग बळीराम चिकणे यांनी हरिपाठाचे महत्त्व सांगताना "हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे, हरे राम हरे राम, राम राम हरे हरे" या महामंत्राचा उल्लेख केला.

हा मंत्र मनःशांती, जीवनाचा उद्देश आणि परमात्म्याच्या शोधासाठी अत्यंत प्रभावी असल्याचे त्यांनी सांगितले. रामजीभाई देवजीभाई पटेल यांनी उपस्थित भक्तांना संबोधित करताना सांगितले की, अखंड हरिपाठ सप्ताहाचा संकल्प घेतल्याने जीवनात मोठे आशीर्वाद प्राप्त होतात.

या व्रताचे शुद्ध व श्रद्धेने पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेच्या वतीने डॉ. नानजीभाई ठक्कर यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. अखंड हरिपाठ सप्ताह भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्मिक वातावरणात उत्साहात सुरू झाला आहे.

# जेडल ग्रुपतर्फे सरस्वती सन्मान सोहळा संपन्न

## ज्ञानाला प्राधान्य दिल्यास यश निश्चित – नानजीभाई ठक्कर

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**




जेडल ग्रुपतर्फे आयोजित सरस्वती सन्मान कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करण्यात आले. हा सन्मान श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी श्री वसंत मजेठिया, हिना मजेठिया, डॉ. निपा गणात्रा, अन्य मान्यवर तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना नानजीभाई ठक्कर म्हणाले, "जर सरस्वती असेल तर लक्ष्मी आपोआप येईल." विद्यार्थ्यांचे मुख्य कर्तव्य अभ्यास करणे, शिस्त पाळणे आणि शिक्षकांचे मार्गदर्शन मनापासून स्वीकारणे हेच असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. ज्ञानवृद्धी, प्रामाणिक परिश्रम आणि नैतिक मूल्ये जोपासल्यास निश्चितच चांगली नोकरी, समाजात मान-सन्मान आणि यशस्वी जीवन मिळते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भारतीय संस्कृतीत देवी सरस्वती ज्ञान, बुद्धिमत्ता व शिक्षणाचे प्रतीक असून देवी लक्ष्मी समृद्धी व वैभवाचे प्रतीक आहे. जीवनात ज्ञान, सद्गुण आणि कठोर परिश्रम असतील तर संपत्ती व यश आपोआप प्राप्त होते—हा विचार आजही तितकाच सत्य असल्याचे त्यांनी सांगितले. तात्काळ लाभाच्या शर्यतीत ज्ञान व संस्कृतीकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती वाढत असली, तरी जो व्यक्ती सरस्वतीला प्रथम स्थान देतो—म्हणजे अभ्यास, बुद्धिमत्ता, नैतिकता आणि कौशल्ये विकसित करतो—तोच दीर्घकाळ टिकणारे खरे यश मिळवतो, असे मत त्यांनी मांडले.

यावेळी हिना मजेठिया म्हणाल्या की, लक्ष्मीच्या मागे धावण्याऐवजी सरस्वतीची आराधना केल्यास लक्ष्मी आपोआप आयुष्यात स्थान घेते. प्रथम ज्ञान मिळवणे, कठोर परिश्रम करणे आणि चांगले नैतिक गुण विकसित केल्यास यश व आनंद आपोआप मिळतो, हा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी वसंत मजेठिया यांनी नानजीभाई ठक्कर यांचे आभार मानले व त्यांच्या कार्याचा सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम जेडल ग्रुप तर्फे यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# विद्यार्थ्यांची हेळसांड

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

ग्रामीण भागातील हुशार, होतकरू विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे त्यांना शिक्षणात आर्थिक अडचण येऊ नये म्हणून शासनाकडून नवोदय व एनएमएमएस आदी परीक्षा घेण्यात येतात. मात्र शिक्षण विभागाच्या ढिसाळ नियोजनाचा सामना अर्धापूर तालुक्यातील विद्यार्थ्यांना करावा लागत आहे. परीक्षा केंद्रावरील गैरसोयीबद्दल विद्यार्थी व पालकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अर्धापूर तालुक्यातील विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा दोन आठवड्यापूर्वी दिली शहरातील दोन्ही परीक्षा केंद्रात ५६३ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली.असता जिल्हा परिषद कन्या शाळेत विद्यार्थ्यांना अनेक अडचणीचा सामना करावा लागला.

# विश्वासाला तडा जाऊ देणार नाही - भगवानराव दंडवे

**भोकर : (समर्थ गांवकरी)**



नगरपरिषद निवडणुकीत शहरातील जनतेने माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास ठेऊन माझ्यासह १७ प्रतिनिधींवर विश्वास दाखवला आणि सेवेची संधी दिली असून शहरातील जनतेच्या नागरी समस्या तसेच विकासात्मक कामांच्या अनुषंगाने जबाबदारीने काम करून जनतेच्या विश्वासाला कुठेही जाऊ देणार नाही असे आश्वासन भोकर नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष भगवानराव दंडवे यांनी व्यक्त केले आहे. दि. २७ डिसेंबर रोजी व्यंकटेश टॉकीज येथे बालाजी पाटील मित्र मंडळाच्या वतीने आयोजित नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामचंद्र मुसळे,नवनिर्वाचित १७ नगरसेवक, तसेच डॉ. मनोज गिमेकर, डॉ. फेरोज इनामदार, सिद्धेश्वर पिटलेवाड, पंकज पोकलवार, विकास क्षीरसागर, शीलाताई कल्याणकर आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना दंडवे म्हणाले की, आम्ही जनहिताच्या प्रश्नांना प्राधान्याने विचारात घेणार असून शहरातील घनकचरा व्यवस्थापन, आणि सुधारित कर प्रणालीवरही लक्ष देणार असल्याचे सांगितले. बालाजी पाटील यांची योग्यता लक्षात घेऊन त्यांचा योग्य तो सन्मान करण्यासाठीआपण स्वतः खा. चव्हाण यांच्याकडे आग्रह धरणार असल्याचेही सांगितले. याप्रसंगी बालाजी पाटील यांच्या वतीने शिल्पा पोकलवार,विठ्ठल धोंडगे, आरती ताई यशवंतकर, योगेश भोकरकर,सपना राणी पिटलेवाड, सुहास पवार,वनश्री लक्षटवार, डॉ. कनोज फातिमा इनामदार,सायरा बेगम इनामदार, दिलीप सोनवडे, मायाताई कसबे, अविनाश वाघमारे, वनमाला क्षीरसागर, जारीना बेगम, नाझीम शेख, छायाताई गिमेकर, विजय पवार आदीं नवनिर्वाचित १७ नगरसेवकांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

# महासार्कच्या सदस्यपदी स्वारातीमचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील तरतुदींची राज्यांमध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद (महासार्क) च्या सदस्यपदी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय नुकताच जाहीर झाला आहे. महासार्कची स्थापना उच्च शिक्षण, संशोधन व उपक्रम क्षेत्रातील उत्कृष्टता अधिक बळकट करण्यासाठी करण्यात आली असून ज्ञाननिर्मिती, जतन व प्रसार, अध्यापन-संशोधन, कौशल्य विकास, प्रशिक्षण, शिक्षण व विस्तार कार्याद्वारे समाजावर सकारात्मक प्रभाव निर्माण करणे हे परिषदेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. परिषदेमध्ये शासनाद्वारे दोन प्र-कुलगुरूंची सदस्य म्हणून नामनिर्देशित नियुक्ती करण्यात येते.

# वाळवंटातही स्वस्तिक पद्म रेखाटणारं व्यक्तिमत्व म्हणजे गुरुवर्य बा. ह. नाईकवाडी

**अकोले : (समर्थ गांवकरी)**




जी माणसं काळाच्या पडद्याआड जाऊनही केवळ आपल्या विचारांनी, कर्तृत्वानी आणि त्यागानी लोकांच्या मनावरच नाही तर त्यांच्या काळजात आपल्या कार्याच्या रूपाने अधिराज्य गाजवत असतात व स्फूर्तीच्या तप्त कुंडात ताऊन सुलाखून निघत अगदी वाळवंटातही स्वस्तिक पद्म रेखाटण्याचे काम थोर स्वातंत्र्यसेनानी गुरुवर्य बा ह नाईकवाडी तथा बाबा यांनी केले असल्याचे गौरोदगार महाराष्ट्रातील प्रख्यात युवा व्याख्याते राहुल गिरी यांनी काढले.येथील श्री अगस्ती एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक स्व. गुरुवर्य बा ह नाईकवाडी तथा बाबा यांच्या 16 व्या स्मृतिदिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते तर तालुक्याचे आमदार डॉ किरण लहामटे यांनी अध्यक्षस्थान भूषविले.आपल्या प्रमुख व्याख्यानात त्यांनी बाबांच्या कार्यकर्तृत्वाला अभिवादन करताना स्वामी विवेकानंद यांची आठवण करून देत ते म्हणाले कि, देशाच्या तरुणांच्या ओठावरचं जे गीत आहे त्यावरून देशाचं हीत सांगता येतं. चांगले विचार व चांगली माणसं आज दुर्लभ असताना या मातीत संकटाच्या छाताडावर अगदी कणखरपणे उभे राहून बालपणीच पितृछत्र हरपले तरीही खचून न जाता आपले शिक्षण पूर्ण करून भावंडासह कुटुंब सावरत स्वातंत्र्याच्या संग्रामात स्वतः होरपळून दुसऱ्यांचे जीवन सुखकर करण्याचे काम बाबांनी केले. चाकातील सर्वच आरे आपल्या जीवनासाठी ती गतिमान असावी लागतात मात्र त्यातील शिक्षण हे एक महत्वाचे अरे बाबांनी बहुजनांच्या विकासाच्या दृष्टीने फिरवून या मातीत चैतन्याचा, प्रगतीचा आणि माणसातल्या अभिजात सर्जनशीलतेचा वसा हाती घेऊन अनेक पिढ्यांचा शिक्षणाचा दिवा चेतवीला व तो प्रज्वल्लीत ठेवला. जगण्याचा खरा अर्थ आपल्या कृतीतून दाखवून देत संस्कारातून खरीखुरी व्यक्तीरेखा आकारली जाते हे त्यांच्या एकूण जीवनशैलीतुन दिसून येते. गिरी यांनी विविध विषयांची गुंफण घालत विद्यार्थी ग्रंथालयाकडे वळायला हवा, तो मद्यालयाकडे जाणार नाही यासाठी शिक्षक व पालक यांची अधिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.पालकांनी मुलांच्या आवडी निवडी ओळखून त्यांना त्यांच्या भविष्यकालीन जीवनासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे असून आमच्या मुलांना सिने अभिनेते आपले आदर्श वाटता कामा नये तर आपले आई वडील हेच खरे आपले हिरो, आदर्श वाटायला हवेत व हीच काळाची गरज आहे.बाबांच्या समृद्ध जीवनाकडे वरचेवर न पाहता त्यांच्या संस्कारांची, त्यागाची आणि कणखर बाण्याची शिदोरी आपल्या सर्वांना अधिक पुढे घेऊन जाईल. आपल्या अध्यक्षीय भाषणात आमदार किरण लहामटे यांनी बाबांच्या निस्सीम कार्याचा गौरव करत अकोले तालुक्यातील बहुजनांचे शिक्षण क्षेत्रातील मागासलेपण बाबांनी दूर करत स्व दुर्गाबाई नाईकवाडी यांनी त्यांना खंबीर साथ देत हा वटवृक्ष वाढविला. बाबांच्या दूरदृष्टीमुळे गोर गरिबांच्या जीवनात प्रकाश पडून त्यांना उभे करण्याचे पवित्र काम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी योगीकेशवबाबा यांनीही समयोचित आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे कार्याध्यक्ष सतीश नाईकवाडी यांनी करत बाबांच्या जीवनातील महत्वपूर्ण प्रसंग सांगत बाबांच्या कार्याचा मागोवा घेतला. यावेळी शिवचरित्रकार प्रा एस झेड देशमुख, संस्थेच्या सेक्रेटरी शैलजा पोखरकर, संस्थेचे कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, पत्रकार विजय पोखरकर, चित्रपट निर्माते मच्छिन्द्र धुमाळ,ज्ञानेशानंद शास्त्री महाराज, यादवराव नाईकवाडी, ॲड के बी हांडे, पत्रकार हेमंत आवारी, सार्वमतचे उपसंपादक अमोल वैद्य,नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, गिरीश नवले, सचिन शिंदे, भाऊसाहेब पारदे यांचेसह माजी सेवानिवृत्त कर्मचारी, संस्थेच्या सर्व शाखेतील कर्मचारी, पालक मोठया संख्येने उपस्थित होते.यावेळी पाहुण्यांचा परिचय घनश्याम माने यांनी करून दिला तर स्वागत संजय शिंदे यांनी केले.

# दिवसा दरोडा टाकणारी सराईत गुन्हेगारांची टोळी जेरबंद!

## ७० लाख, ३२ हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत

पुणे : (समर्थ गांवकरी)

खानापूर गावातील सराफ दुकानावर दिवसा सशस्त्र दरोडा टाकणारी सराईत गुन्हेगारांची टोळी ४८ तासांत केली जेरबंद, सुमारे ५६ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने असा एकूण ७० लाख ३२ हजार रूपये किमतीचा मुद्देमाल,पुणे ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस तसेच हवेली आणि वेल्हे पोलीसांनी हस्तगत केला आहे.

हवेली पोलीस स्टेशनमध्ये दि.२६ डिसेंबर २०२५ रोजी गुन्हा दाखल आहे.दि.२६ डिसेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास दिवसाढवळ्या पाच आनोळखी दरोडेखोरांनी हातात तलवार, कोयता अशी हत्यारे घेवून, खानापूर गावातील वैष्णवी ज्वेलर्स या सराफ दुकानावर सशस्त्र दरोडा टाकून दुकानातील मालक व महिला कामगार यांना हत्याराचा धाक दाखविला आणि सुमारे ८४ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण सुमारे एक कोटी पाच लाख रूपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला होता, सदर प्रकाराबात दुकान मालक यांच्या पत्नी राणी अमोल बाबर वय २८ वर्षे, व्यवसाय सोनार दुकान, रा, खानापूर, ता. हवेली जि. पुणे मुळ रा. वाळज शिवेचामळा ता. खानापूर जि.सांगली यांनी वरील प्रमाणे फिर्याद नोंदविली आहे.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवून पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल,अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे यांनी घटनास्थळी भेट दिली. सराफ दुकानावर भर दिवसा सशस्त्र दरोडा पडल्याने खानापूर परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले होते. दरोडेखोरांनी भर दिवसा सशस्त्र दरोडा टाकल्याने एक प्रकारे पोलीसांना आव्हान केले होते, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याचे अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेची चार पथके, हवेली पोलीस स्टेशन व वेल्हे पोलीस स्टेशन कडील तपास पथके अशी एकूण सहा तपास पथके तयार केली. गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने योग्य ते मार्गदर्शन व सुचना देण्यात आल्या, दरोडेखोर हे दरोडा टाकलेनंतर पानशेत च्या दिशेने गेल्याचे साक्षीदार यांनी सांगितले होते.त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच पोलीस निरिक्षक अविनाश शिळीमकर यांच्या नेतृत्वाखाली तपास पथकांमार्फत दरोडेखोरांचा शोध सुरू करणेत आला. सदर गुन्ह्यात दोन मोटार सायकलचा वापर झालेला होता,एकूण पाच दरोडेखोर निष्पन्न करणेत आले,तपास पथकांनी सीसीटीव्हीचे आधारे मोटार सायकलचा मागोवा घेण्यास सुरूवात केली,ठिक-ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली.दरोडेखोर यांनी दोन्ही मोटार सायकल वेगवेगळ्या रस्त्याने वेल्हे गावाचे दिशेने नेल्याची माहिती प्राप्त झाली.तपास पथकांनी सलग दोन दिवस, दिवस-रात्र तपास करून गुन्ह्यातील मोटार सायकल घेवून दरोडेखोर हे वेल्हे तालुक्यातील सिगापुर डोंगरात जंगलाकडे गेल्या असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांकडील उपलब्ध सीसीटीव्ही फुटेजचे आधारे गोपनीय बातमीदार सतर्क करण्यात आला असता,पथकातील स्थानिक. गु.शा.चे पो.हवा. अमोल शेडगे यांना गोपनीय वातमीदाराकडून बातमी मिळालो को, गुन्ह्यातील मुख्य आरोपी हा अंकुश दगडू कचरे रा.सिगापूर मोहरी,पो. चरोती, ता.बेल्हे जि.पुणे हा असून त्याने त्याच्या इतर साथीदाराचे मदतीने गुन्हा केला आहे. मिळालेल्या माहितीची खात्री करून दि. २८ डिसेंबर रोजी आरोपी १) अंकुश दगडु कचरे, वय २० वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर, सध्या रा.जैन मंदिराजवळ, साईनगर कात्रज, पुणे, मूळ रा. सिगापूर मोहरी, पो.वरोती, ता. वेल्हे जि. पुणे २) गणेश भांव कचरे वय २३ वर्षे, रा.जैन मंदिर, वाघजाईनगर कात्रज, पुणे, मुळ रा. हारपूड, पो.वरोती, ता.वेल्हे जि.पुणे यांना सिगापूर डोंगरातील जंगलातून ताब्यात घेण्यात आले, सदर आरोपीकडे चौकशी केली असता, त्यांनी त्यांचे इतर साथीदार तीन विधीसंघषित बालक यांच्या मदतीने सदरचा गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झाले आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या दोन्ही आरोपींना विश्वासात घेवून तपास केला असता, त्यांचेकडून गुन्ह्यात वापरलेला कोयता व ५६ तोळे २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा ७० लाख ३२ हजार रूपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपींना मा.न्यायालयात हजर केले असता दि.५ जानेवारी २०२६ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर करण्यात आलेली आहे.



## सार्वजनिक शौचालयांची कामे पूर्ण करा



नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन तसेच सार्वजनिक शौचालयांची कामे येत्या दि १० जानेवारी पूर्वी पूर्ण करून त्यासाठीचा उपलब्ध निधी पूर्णतः खर्च करण्यात यावा, असे निर्देश जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे प्रकल्प संचालक तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी मयूर आंदेलवाड यांनी दिले.

नायगाव पंचायत समिती सभागृहात आज ग्रामपंचायत अधिकारी यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस गट विकास अधिकारी पी. टी. वैष्णव, विस्तार अधिकारी पी. एस. जाधव, गणेश टोनगे, स्वच्छता तज्ञ विशाल कदम, समाजशास्त्रज्ञ महेंद्र वाठोरे, माहिती-शिक्षण व संवाद सल्लागार नंदलाल लोकडे तसेच गट समन्वयक दत्ता इंदूरकर उपस्थित होते. उप मुख्य कार्यकारी अधिकारी मयूर आंदेलवाड यांनी यावेळी नायगाव तालुक्यात सुरू असलेल्या सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाच्या कामांचा सविस्तर आढावा घेतला. संबंधित सर्व कामे तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच ग्रामीण भागातील ज्या कुटुंबांकडे अद्याप शौचालयांची सुविधा उपलब्ध नाही, अशा सर्व कुटुंबांना प्राधान्याने शौचालय उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी दिले. नायगाव तालुक्यात सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची २५ गावांमधील कामे अद्याप अपूर्ण आहेत. यासोबतच सार्वजनिक शौचालयांची १५ कामे प्रलंबित कामे पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले. गावांमध्ये शंभर टक्के शौचालय वापर, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, सेग्रीगेशन शेड, घनकचरा प्रक्रिया आदी स्वच्छताविषयक सर्व कामे पूर्ण करून गावे अधिक सक्षमपणे हागणदारीमुक्त करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. सर्व निकष पूर्ण करून १० जानेवारी पर्यंत गावे हागणदारीमुक्त अधिक घोषित होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे आवाहनही उपमुख्य कार्यकारी अधिकारी मयूर आंदेलवाड यांनी यावेळी केले.

## तामशात शाळकरी मुलांचे गँगवार

तामसा : (समर्थ गांवकरी)

तामसा शहरात शाळकरी मुलांचे गँगवार सुरु असून लहान मुलं शाळा मध्यन्त सुट्टी च्या वेळी गेट चा बाहेर येऊन हाणामारी प्रकरण वाढत असल्याने पालकवर्गात चिंतेच वातावरण आहे. सदरील प्रकरण जिल्हा परिषद हायस्कूल च्या विध्यार्थी वर्ग ८ते १०व्या वर्गात शिकणाऱ्या शाळकरी मुलं काहीन काही कारणाने आपसात भांडण करत आहे ही भांडण विशेषतः पोलीस ठाण्यासमोर होतं असल्याने पोलीस च्या कार्यक्षमतेवर प्रश्न निर्माण होतो. पोलीस ठाण्याच्या नियंत्रण न राहिल्यामुळे ही तरुण पिढीत गुन्हेगार प्रवतीत वाढहोत आहे. शाळेच्या सराव परीक्षा सुरु असून काही तुक्कार मुलं शाळेच्या मध्यानंतर च्या वेळी गेटचा बाहेर येऊन आपसात भांडण करत आहे.

## अध्यक्षपदी श्री मुकेश पवार व कार्याध्यक्षपदी शरद पवार गोरक्ष कदम

अकोले : (समर्थ गांवकरी)

अकोले येथे सुतार समाजाच्या व कार्यकर्त्यांच्या आर्थिक योगदान धुमाळवाडी येथे तालुकास्तरीय भगवान श्री विश्वकर्मा मंदिराचे काम गेली आणि वर्ष चालू आहे मंदिराच्या रखडलेल्या कामाला गती देण्यासाठी समाजातील कार्यकर्त्यांच्या रेट्यामुळे व तरुणांच्या दबावामुळे या कामास नुकताच मुहूर्त मिळाला गेल्या नऊ ते दहा वर्षापासून समाजातील गट तट मी पणा अहंकार श्रेय ह्या गोष्टी आपापसातील हेवेदावे व मतभेद यामुळे मंदिराचे काम रखडले होते मात्र नव तरुणांच्या व ज्येष्ठांच्या विचारसरणीने पुन्हा एकदा त्याला चांगले स्वरूप प्राप्त झाले समाजाचे ज्येष्ठ नेते ह भ प भाऊराव मारुती जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सर्व समावेशक निर्णय घेण्याचे ठरले त्यानुसार इच्छुक अध्यक्ष पदासाठी स्वतःहून भाऊसाहेब वाकचौरे व मुकेश पवार यांनी आपले





नाव जाहीर केले मात्र कोणते मतदान व निवडणूक न घेता रोशात्मक गोष्टी नको म्हणून श्री भाऊसाहेब वाकचौरे यांचे नाव जनतेतून एका विश्वस्तांनी जाहीर केले मात्र मुकेश पवार हे जाहीर करताच मुकेश पवार आक्रमक होऊन निघून चालले होते मात्र ज्येष्ठांनी मध्यस्थी करत मुकेश पवार यांची मनधरणी केली व वाकचौरे यांनी मनाचा मोठेपणा दाखवत उपाध्यक्ष पद माझ्याकडे द्या माझे काही हरकत नाही असे म्हणत सर्वांना विश्वास दिला व सर्वांनी या निर्णयाचे कौतुक केले व अखेर मुकेश पवार यांची अध्यक्षपदी निवड झाल्याची घोषित केले यावेळी अध्यक्ष म्हणून मुकेश विठ्ठल पवार सुनील मधुकर गोरे कार्याध्यक्ष शरद पवार .गोरक्ष कदम खजिनदार प्रदीप कदम विनोद शिरसाट सचिव नितीन एन.टी .कदम सर प्रसिद्धीप्रमुख भाऊसाहेब वाकचौरे प्राचार्य आदिनाथ सुतार सर संपर्कप्रमुख प्रा ह भ प दिपक राऊत सर निवृत्ती सूर्यवंशी सल्लागार ह भ प भाऊराव मारुती जाधव रामनाथ गणपत कदम बाळासाहेब निवृत्ती वाकचौरे रामनाथ छबुराव सूर्यवंशी संजय मधुकर सूर्यवंशी बापूसाहेब लक्ष्मण गोरे अशोक गजानन वाकचौरे आर्दीची निवड करण्यात आली यावेळी प्रत्येक विभागातून उपस्थित असलेल्या विश्वस्त म्हणून ट्रस्टमध्ये सामावून घेण्यात आले यावेळी प्राचार्य किरण भागवत सर यांनी या बैठकीचे प्रास्तविक केले सर्वांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेवून संघटितपणे समाजाच्या कामासाठी एकत्र यावे व विश्वकर्मा मंदिराची काम अत्यंत गतीने करावे अशी आवाहन केले.

त्यांनी अतिशय आक्रमकपणे समाजाच्या हितासाठी अभ्यासपूर्ण प्रबोधन केले यावेळी भाऊराव जाधव उज्वलाताई राऊत रामनाथ कदम संजय सूर्यवंशी श्रीपाद भालेराव राहुल राऊत निवृत्ती सूर्यवंशी बाळासाहेब वाकचौरे रामनाथ सूर्यवंशी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या नवीन पदाधिकाऱ्यांच्या वतीने स्वतःहून मंदिराच्या आर्थिक निधीची घोषणा केली.

## ना युती ना आघाडी सर्वच पक्षांचा स्वबळाचा नारा

- भाजपा, शिवसेना , आमने सामने, तर विद्यमान प्रभाग क्र १९ व २० मधील चार विद्यमान नगर सेवकांना भाजप चा डिचु तर
- अनेकांनी दुसऱ्या पक्षाच्या झेंडा घेऊन उमेदवारी केली दाखल




नांदेड : (समर्थ गांवकरी)

नविन नांदेड दक्षिण मध्ये प्रभाग क्र १९ व २० मध्ये ना युती ना आघाडी सर्वच पक्षांचा स्वबळाचा नारा भाजपा, शिवसेना , आमने सामने सरळ होणार लढत तर भाजपाचे विद्यमान प्रभाग क्र १९ मधील २ नगरसेवक तर प्रभाग क्र २० मधील २ विद्यमान नगरसेवकांना भाजप ने डिचू देत सोडले वाऱ्यावर तर

अनेकांनी दुसऱ्या पक्षाच्या झेंडा घेऊन उमेदवारी दाखल करुण निवडणुक रिंगणात सज्ज झाले आहेत. दि ३० डिसेंबर रोजी मनपा सिडको झोन येथे निवडणुक विभाग असून या कार्यालयात आज शेवटचा दिवस असल्यामुळे सकाळ पासूनच निवडणुकी साठी उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवारांची रांगा लागल्या होत्या तर दुपारी दोन च्या नंतर भाजपा शिवसेना व इतर पक्षाच्या बि फॉर्म भरून प्रत्येक उमेदवारांना पक्षाचे अधिकृत घोषणा करण्यात आली तर भाजपा च्या वतीने प्रभाग क्र २० मध्ये सर्वसाधरण पुरुष संजय पाटील घोगरे तर सर्वसाधारण महिला सौ .सुवर्णा सतिष बस्वदे तर ओबीसी पुरुष वैजनाथ देशमुख . तर ओबीसी महिला मंगला गजानन देशमुख . तर एस सि महिला सौ निरंजना राजू लांडगे यांची अधिकृत उमेदवारी जाहीर तर प्रभाग क्र १९ मधुन सर्वसाधारण महिला सौ अनुराधा राजु काळे . तर ओबीसी महिला श्रीमती सुलोचना धोंडीबा काकडे तर एस टी सौ दिपाली संतोष मोरे तर एस सि पुरुष अभिषेक सौदे यांची उमेदवारी भाजपाच्या वतीने जाहीर करण्यात आले असून या सर्व उमेदवारांनी

प्रभाग क्रमांक १९ / २० मधील सर्व उमेदवारांनी कामाला लागले आहेत या मध्ये भाजपने विद्यमान चार उमेदवारांना उमेदवारी नाकारल्या मुळे अनेकांनी तर्क वितर्क लावत आसल्याचे दिसून आले आहे हे सर्व उमेदवार निवडुक रिंगणात सज्ज झाले तर निवडणुक प्रिक्रिया पूर्ण करण्यासाठी निवडणूक विभागातील सर्व अधिकारी कर्मच्यारी सज्ज असल्याचे दिसून आले तर नांदेड ग्रामीण पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोळकर यांनी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा कडेकोट बंदोस्त ठेवला होता.

## नॅशनल अवार्ड पुरस्कार जाहीर

मुखेड : (समर्थ गांवकरी)

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातील प्रा.डॉ. संग्रामजी आदे,यांना पंडित जवाहरलाल नेहरू नॅशनल अवार्ड 20025चा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार असल्याचे सूत्राकडून माहिती मिळाली आहे. निती आयोग भारत सरकार तर्फे हा पुरस्कार नवी दिल्ली या ठिकाणी वितरित करण्यात येणार असल्याचं समजते त्यांच्या शैक्षणि आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे आतापर्यंत त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले असून त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अडकिने, तसेच एस बी. गोणे, प्राचार्य मस्के सर, प्रा. आहेर सर, इत्यादींनी त्यांचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

## जांभळा येथे प्राथमिक स्वास्थ्य केंद्र साठी पाठपुरावा

- आदिवासी दुर्गम भागात स्वास्थ सेवा उपलब्ध करण्यासाठी आमदार कोहलीकर यांनी केला पाठपुरावा
- स्वास्थ सेवा उपलब्ध करण्यासाठी १५ ते ३० किमी करावंलागते प्रवास




तामसा : (समर्थ गांवकरी)

हदगांव तालुक्यातील आदिवासी दुर्गम भाग मनहून ओळख असलेल्या जांभळा भागात बहुसंख्य आदिवासी समाज वास्तव करते या भागात मूलभूत स्वास्थ सेवा उपलब्ध करण्यासाठी जांभळा येथे प्राथमिक स्वास्थ केंद्र उभारणी साठी आमदार बाबुराव कदम कोहलीकर यांनी संबंधित विभागात पाठपुरावा करून लवकरच या भागात प्राथमिक स्वास्थ केंद्र उभारण्यात येईल असं आश्वासन कोहलीकर यांनी दिले.. तामसा येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर झाल्याने तामसा येथील प्राथमिक स्वास्थ केंद्र जांभळा येथे स्थलांतर करण्यासाठी हदगांव विधानसभा चे आमदार बाबुराव कोहलीकर यांनीसार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांना निवेदन दिले. या भागात आदिवासी बहुल भाग असल्याने वेळेवर स्वास्थ सुविधा उपलब्ध होतं नाही प्राथमिक उपचारासाठी १५ते ३० किमी प्रवास करावा लागते या परिसरात १५ ते २० आदिवासी (वाडी)असून मजदूर वर्ग असल्याने पुरुष मंडळी आपली उपजीविका भागवण्यासाठी बाहेर राज्यात कामाचा शोधात जावं लागते. मुलं महिलांना वेळेवर आरोग्य सेवा उपलब्ध व्हावं या साठी मूलभूत स्वास्थ सेवा लवकरच उपलब्ध होणार.

## डॉ. धोंडगे यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त
## कीर्तन सोहळ्याचे आयोजन

कंधारः (समर्थ गांवकरी)

माजी आमदार व माजी खासदार, जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी, शिक्षणमहर्षी, मन्याड खोऱ्यातील शेकापचे ज्येष्ठ नेते दिवंगत डॉ.भाई केशवराव धोंडगे यांच्या तृतीय स्मृति दिनानिमित्त बहाद्दरपुरा येथे गुरुवारी सकाळी १० वाजता प्रसिद्ध कीर्तनकार वारकरी वैभव ह.भ.प. आदिनाथ महाराज लाड (देवाची आळंदी )यांच्या कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. एक जानेवारी २०२३ रोजी भाईंचे वृद्धकाळाने वयाच्या १०२ व्या वर्षी निधन झाले होते. त्यांचा तिसरा स्मृतिदिन गुरुवारी साजरा केला जाणार आहे. यानिमित्त बहाद्दरपुरा येथे एक जानेवारीला सकाळी १० वाजता लाड महाराज यांच्या कीर्तनाचे



आयोजन करण्यात आले आहे. तदनंतर दुपारी सव्वा बारा वाजता भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मन्याड खोऱ्यातील सर्व जनतेने कीर्तन सोहळ्यासाठी व भोजनासाठी मित्र परिवारा सोबत उपस्थित राहावे असे आवाहन अॅड.मुक्तेश्वर केशवराव धोंडगे,प्रा.डॉ.पुरुषोत्तम केशवराव धोंडगे यांनी केले आहे.

## अकोले ग्राहक दिनी तक्रारींचा पाऊस ग्राहक दिनात आलेल्या सर्व प्रश्नांचे निराकरण करा

अकोले : (समर्थ गांवकरी)

अकोले येथे 39 वा राष्ट्रीय ग्राहक दिन अकोले तहसील कार्यालयात तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला कार्यक्रमास ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, तालुका अध्यक्ष दत्ता शेणकर, कार्याध्यक्ष महेश नवले, वीज वितरणचे शेळके, डॉ.सुनील शिंदे, अनंत घाणे, भाऊसाहेब वाकचौरे, माधवराव टिटमे, प्रमोद मंडलिक, वसंत बाळसराफ आदी होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्राहक पंचायतीचे संस्थापक स्व.बिंदू माधव जोशी व जागतिक किर्तीचे शिल्पकार पद्मश्री राम सुतार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. ग्राहक दिनाला



यावेळी ग्राहकांची विक्रमी उपस्थिती होती. मात्र प्रमुख अधिकारी अनुपस्थित असल्याने तहसीलदार डॉ.सिद्धार्थ मोरे यांनी सुरुवातीलाच अधिकारी जरी उपस्थित नसले तरी सर्व अर्जाचा त्या त्या अधिकाऱ्यांकडून त्यांच्या विभागाच्या अर्जाचे निराकरण करण्याची ग्वाही त्यांनी दिली, मात्र कार्यकर्ते व ग्राहक याबाबत मुख्य अधिकारीच जर नसेल तर प्रश्न कसे सुटणार असा प्रश्न ग्राहक विचारत होते. याबाबत तहसीलदार त्यांना नोटीस पाठवणार असून त्यांची विचारना करणार असल्याने त्यांनी सांगितले. तसेच यावेळी अकोले नगरपंचायतने 2026 ते 2030 पर्यंतची कर मूल्यांकन आकारणी अवास्तव आहे अकृषिक वापराची सनद (औद्योगिक प्रयोजन) महसूल बाबतच्या अर्जावर चर्चा झाली. नाशिक- पुणे रेल्वे. नाशिक, सिन्नर, देवठाण, अकोले, संगमनेर, आळेफाटा, नारायणगाव, मंचर, खेड, पुणे अशी असावी ही मागणी ग्राहक पंचायत अकोले यांनी केली. घरगुती गॅससाठी ज्यादा पैसे आकारणी केली जात आहे. गॅसचे सबडीलर शोधा व त्यांच्यावर कारवाई करा.

अकोले नगरपंचायतचे शहराचे ड्रेनेजची पाणी प्रवरा नदीच्या पात्राच्या प्रवाहात सोडू नये त्याचबरोबर दूषित पाणी होत असल्याने त्यावर पर्याय शोधावा. संगमनेर ते अकोले- राजुर- बोरी कोल्हार-घोटी राज्य मार्गावर असलेली अपुरे कामे, छोटे पूल, साईड पट्ट्या, रस्त्यांच्या दोन्ही बाजूने वृक्ष लागवड, रस्त्यावर पडलेले खड्डे, दिशादर्शक रोड साईन, झेब्रा क्रॉसिंग पट्टे टाकावे, खड्यांबाबत व स्पीड ब्रेकर बाबत हायकोर्टाने दिलेल्या आदेशाचे सार्वजनिक बांधकामच्या अधिकाऱ्यांनी पालन करावे, अकोले ग्रामीण रुग्णालय हे सुगाव खुर्द येथे आहे तेथे तात्काळ शवविच्छादेन केंद्र तेथे सुरू करावे, तसेच शिधापत्रिका, रेशन कार्ड गॅसच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात ग्राहकांच्या तक्रारी आल्या, अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालू असून, अकोले शहरात व तालुक्यात चालू आहे ते बंद व्हावे, अकोले शहरासह 32 गावाला पाणीपुरवठा होणारी 32 गावची योजना 15 ते 20 वर्षांपासून रखडली आहे. अजूनही पूर्ण होत नाही प्रत्येक वर्षी वाढीव निधीचा प्रस्ताव केला जातो.

तालुक्यात बिबट्यांचे हल्ले वाढत आहे पिंजरे त्वरित वाढवा व लावावीत, भूमी अभिलेख कार्यालयाच्या अनेक तक्रारी अर्ज आले, बीएसएनएलच्या अनेक अडचणी मांडल्या. माळीझाप, उंचखडक बु, ते इंदोरी रस्त्याचे रुंदीकरण, पुलाची उंची वाढवणे, निळवंडे कालव्याचे ठिकठिकाणचे अपुरे कामे, रस्ते त्वरित व्हावे इत्यादी मागण्या ग्राहकांनी यावेळी केल्या.

यावेळी शारदा शिंगाडे, सुमन जाधव, मंगल मालुंजकर, हरिभाऊ अस्वले, राम रुद्रे, नरेंद्र देशमुख, वसंत बाळसराफ, सुनील देशमुख, ज्ञानेश पुंडे, माधव टिटमे, रमेश नाईकवाडी, अनंत घाणे, जालिंदर बोडके, रामदास पवार, सुरेश आवारी, भाजपचे भाऊसाहेब वाकचौरे, प्रा.बाळासाहेब बनकर, संदीप मालुंजकर, सुदाम मंडलिक, संदीप निळे, अर्चना एखंडे, योगेश कापसे, कॉ.तुळशीराम कातोरे, संतोष वाकचौरे, रामदास पांडे, खादी ग्रामोद्योगाचे संचालक भाऊसाहेब वाकचौरे, अशोक उगले कैलास तळेकर, प्रास्ताविक दत्ता शेणकर, अर्जाचे वाचन कार्याध्यक्ष महेश नवले, सूत्रसंचालन राम रुद्रे यांनी आभार मानले.